मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ८९ ✦ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✦ मार्च २०१२

वेबसाईट : www.marathepratishthan.org ✦ ई मेल : maratheparivar@yahoo.co.in

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय





२५ डिसेंबर रोजी मराठे परिवाराचे कुलसंमेलन व पुणे शाखेचा वर्धापन दिन साजरा झाला.

प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना सप्रेम नमस्कार,

सन २०१२ च्या नव्या वर्षातील मार्चमध्ये हितगुजचा अंक प्रसिद्ध होत आहे. पुणे येथे महालक्ष्मी सभागृहातील आदित्य हॉल येथे दिनांक २५ डिसेंबर २०११ला मराठे प्रतिष्ठानचे कुलसंमेलन आणि वर्धापनदिन साजरा झाला. त्या निमित्ताने आपण भेटलो होतो. त्याचे सविस्तर वृत्त याच अंकात प्रकाशित झाले आहे. श्री. प्रशांत प्रभाकर मराठे या कर्तबगार व्यक्तिमत्त्वाचे दर्शन या संमेलनात झाले ही विशेष उल्लेखनीय गोष्ट मला वाटते. मराठे परिवाराला श्री. प्रशांत यांचा अभिमान वाटतो.

मुद्दाम वेळ काढून ज्याचं वाचन करावं, अशा प्रकारच्या साहित्यासाठी मासिक हे माध्यम आजही सोयीचं आणि उपयोगी आहे असे मला वाटते. मासिकातील साहित्य हे बातम्यांच्या आणि जाहिरातींच्या भाऊगर्दीत हरवून जात नाही. दैनिक वा साप्ताहिकाप्रमाणे, वृत्तपत्र किंवा वर्तमानपत्राप्रमाणे घडलेल्या घटनांवर घाईघाईने भाष्य करायची मासिकाला गरज नसते. लेखनाचा योग्य तो आस्वाद घ्यायला, त्यावर चिंतन करायला आवश्यक तो निवांतपणा मासिक आपल्याला देत असतं. 'हितगुज' विषयी हेच म्हणता येईल.

चांगली मराठी सिरीयल नाही, चांगलं मराठी हॉटेल नाही, चांगला मराठी चित्रपट नाही, ट्रॅफीक जॅम, महागाई, स्वार्थी राजकारण, भ्रष्टाचार.. वगैरे रडगाणं आपण गातच असतो. अशावेळी मराठे परिवारातील चांगलं मराठी दर्जेदार साहित्य वाचण्याची ज्यांना इच्छा आहे त्यांच्यासाठी 'हितगुज' त्रैमासिक ती पूर्ण करील, असा विश्वास मला वाटतो.

या अंकात श्री. ना. ज. जाईल यांची स्वानुभवावर आधारित लघुकथा त्यातील जिवंतपणा साकारणारी असल्याने मनाला भावते. दूरदर्शनच्या पडद्यावर किंवा बोल-पटाच्या कथेतून रंगवून, खुलवून सांगण्याजोगा आहे. 'गोष्ट साधी....' असे लेखकाला वाटले असले तरी ती ज्या उंचीवर जाते तो शेवट कथेचा 'क्लायमॅक्स' उच्चबिंदू ठरतो. केवळ ना. ज. जाईलसारख्या प्रतिभावंत लेखकालाच हे साधू शकते.

श्रीमती मृदुला सुहास मराठे यांचा

◉ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे : ८/१३, सहकारनगर, वडाळा , मुंबई-४०००३१ ◉

दूरध्वनी : २४१५०८८९ ◆ ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com

◆ अक्षरजुळणी : सौ. अनघा विवेक मराठे, ठाणे. फोन : ९८३३११९०२ ◆

Marathe Pratishthan

'मराठीचं भूत' हा विनोदी निबंध वाचनीय आहे. 'माझे बाबा' हा श्रद्धांजलीपर लेख. मराठे कुलसंमेलनाचे, वर्धापनदिनाचे सविस्तर वृत्त. 'गुणगौरव' कविता, वाचकांचा पत्रव्यवहार, मानसन्मान, सहवेदना इत्यादी नेहमीचा मजकूर या अंकात आहे.

श्रीयोगेश्वरी माता व श्रीव्याडेश्वर ही समस्त चित्पावन आबालवृद्ध, भक्तांची परमदैवते आहेत. परंतु अंबेजोगाई - गुहागर ही ठिकाणे लांब असल्याने अनेकदा मनात इच्छा असूनही भक्तांना जाता येत नाही पण त्यांनी नाराज होण्याचे कारण नाही. कारण कर्जत तालुक्यात कोंढाणे येथे अंबेजोगाई येथील योगेश्वरी माता मंदिर व गुहागर व्याडेश्वर श्रीशंकर ही भव्य देवळे बांधण्यात आली आहेत.

उल्हास नदीच्या काठी, पवित्र, रम्य ठिकाणी हे तीर्थस्थळ झाल्याने कौटुंबिक सहल म्हणूनही या ठिकाणी भेट देता येईल. समस्त गोगटे कुटुंबीयांत तन-मन-धनाने योगदान देऊन ही भव्य मंदिरे बांधली आहेत. मराठे परिवारातील कुलबांधवांनीही या मंदिरांना भेटी देऊन देवतांचा आशीर्वाद, कृपादृष्टी मिळवावी श्री. दिगंबर शिवराम गोगटे, विनायक दत्तात्रय गोगटे, अभय दत्तात्रेय गोगटे, अनिल दत्तात्रय गोगटे यांचे योगदान प्रशंसनीय आहे. असो.

'हितगुज'साठी जाहिराती, देणग्या देऊन सहकार्य करावे ही विनंती. आणि 'हितगुज'ला आर्थिक सहकार्य करणाऱ्यांचे आभार.


- आपली शुभचिंतक


**डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे, (पृ.१२०)**

८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई ४०० ०३१

दूरध्वनी : ०२२-२४१५०८८९

दिनांक : २३ फेब्रुवारी, २०१२


# मानसन्मान



**चि. अद्वैत अतुल मराठे** याने मार्च २०११ साली झालेल्या इयत्ता दहावी या शालांत परीक्षेमध्ये ७३% गुण मिळवून प्रथम श्रेणी प्राप्त केली. त्या परीक्षेत त्याला गणित (सामान्य गणित) या विषयामध्ये १५० पैकी १२३ इतके गुण व इंग्रजी या विषयामध्ये १०० पैकी ८२ गुण मिळाले.

जन्मत: अंध असल्याने त्याने आतापर्यंत या सर्व परीक्षा लेखनिकाच्या (Writer) मदतीने पार पाडल्या आहेत व खडतर परिश्रमानंतर छान यश संपादन केले आहे. इयत्ता अकरावीसाठी त्याने फर्ग्युसन कॉलेजमध्ये आर्टस् या विभागात प्रवेश घेतला आहे.

चि. अद्वैत अतुल मराठे याचा २००८ साली झालेल्या मराठे प्रतिष्ठान या संमेलनात स्वतंत्र गाण्याचा कार्यक्रम झाला होता. सध्या तो शास्त्रीय गायनाचे धडे पंडीत श्री. मुकुंद मराठे यांच्याकडून घेत आहे. तसेच हिंदी, उर्दू गझल गायकीचे शिक्षण प्रसिद्ध गझलगायक श्री. अन्वर कुरेशी यांचेकडून घेत आहे.

डिसेंबर २०१० मध्ये सुगम संगीताचा दोन वर्षांचा डिप्लोमा त्याने ८४% गुणांसह विशेष प्राविण्य मिळवून पूर्ण केला आहे. भविष्यात गायन या कलेत उच्च शिक्षण घेऊन करिअर करण्याची त्याची इच्छा आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा चि. अतुलचे हार्दिक अभिनंदन, गायनासाठी खूप खूप शुभेच्छा आणि शुभाशीर्वाद.

**अद्वैतचे वडील श्री. अतुल शं. मराठे यांचा फोन ९४२२३१५३८५**

Marathe Pratishthan

# मराठे प्रतिष्ठानचे कुलसंमेलन व ३२वा वर्धापनदिन

मराठे प्रतिष्ठानचे कुलसंमेलन व पुणे शाखेचा ३२वा वर्धापन दिन रविवार दिनांक २५डिसेंबर २०११ ला महालक्ष्मी सभागृह येथील आदित्य हॉल, पुणे येथे थाटामाटात साजरा झाला.

सौ. देवयानी दीक्षित (चक्रदेव यांची माहेरवाशीण) आणि त्यांचे चिरंजीव नील यांच्या गायनाने कार्यक्रमाला प्रारंभ झाला 'नमन नटवरा विस्मयकारा' आणि 'पंचतुंड धर रत्नमाला' या नांदीने सुरुवात झाली. सौ. देवयानी दीक्षित (चक्रदेव) यांनी बालगंधर्व नाटकातील,'उजळीत जग मंगलमय अरुणबिंब आले.', 'माझी रेणुका माऊली कल्पवृक्षाची सावली' ही गाणी म्हटली तर चि. नीलने (लहान असूनही) आपल्या पहाडी आवाजात 'राजस सुकुमार मदनाचा पुतळा' हा अभंग म्हणून टाळ्यांच्या कडकडाटात श्रोत्यांची वाहवा मिळवली. सौ. देवयानींने आपल्या सुरेल आवाजात 'अमृताहूनी गोड नाम तुझे देवा' गाणे म्हणून समाप्ती केली. श्री. प्रसाद सबनीस यांनी तबला तर श्री. माधव वावगी यांनी पेटीची उत्तम साथ केली. श्रीमती सुलभाताई मराठे यांच्याहस्ते कलाकारांचा सत्कार करण्यात आला.

सनई वादनाने पुढील कार्यक्रमास सुरुवात झाली. मराठे प्रतिष्ठानचे विश्वस्त श्रीमती सुलभाताई मराठे, अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे, उपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस, संपादिका डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, श्री. अरुणराव मराठे व्यासपीठावर विराजमान झाले. श्री. अरुणराव मराठे यांच्या हस्ते सर्वांचा सत्कार करण्यात आला. श्री. सी. गो. खांबेटे यांनी मराठे प्रतिष्ठानचा अहवाल सादर केला. सौ. नीलांबरी मराठे यांनी आपले मनोगत मांडले, ''पुणेशाखेतर्फे कुलसंमेलनसाठी कार्यालय बुक केले, परंतु नोंदणीचे प्रमाण खूपच कमी झाल्याने संमेलन करावे का न करावे अशी परिस्थिती निर्माण झाली, परंतु कर्नल प्रमोदन मराठे यांच्या खटपटीमुळे संमेलन करण्याचे ठरले आणि नंतर जवळ जवळ शंभरच्या वर कुलबांधव संमेलनासाठी पुणे, मुंबई, अमरावती, इतर बाहेरगावांहून आले. मराठे परिवारातील सर्व लोकांनी आपल्या घरातील कार्य आहे असे समजावे म्हणजे मराठे प्रतिष्ठानचा विकास होईल.'' असे त्यांनी सांगितले. श्री. गजानन मराठे, पुणे यांनी त्यांच्या वडिलांच्या स्मरणार्थ घेत असलेल्या स्पर्धेविषयी सांगितले. यानंतर 'हितगुज' संपादिका डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे यांनी हितगुजसाठी येणारा खर्च व वाढती महागाई या सर्वांची सांगड घालून अंक काढावा लागतो. अंकासाठी विज्ञापने, पृष्ठदान देऊन हितगुज राखीव फंडनिधीला सदस्यांनी जास्तीत जास्त उदारहस्ते मदत करावी असे आवाहन केले आणि 'हितगुज'चे महत्त्व कसे आहे ते थोडक्यात सांगितले.

श्री. प्रशांत प्रभाकर मराठे यांना भाभा अणुसंशोधन केंद्राचे रिसर्च अँड डेव्हलपमेंट तंत्रज्ञान पुरस्कार पाच लाख रुपये आणि मानपत्र, सुवर्णपदक मिळाले त्याबद्दल अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे यांच्या हसते टाळ्यांच्या गजरात श्री. प्रशांत मराठे यांचा सत्कार करण्यात आला. सर्व मराठे परिवाराला श्री. प्रशांत मराठे यांच्याबद्दल अभिमान वाटेल. श्री. प्रशांत मराठे यांनीही मनोगत व्यक्त केले. बीएआरसीत २८वर्षे त्यांनी काम केले. पॉवर इलेक्ट्रोनिक, कॉम्फेट लाईट वॉटर कसे केले. अणुऊर्जा, पाणबुड्या इ. वर कसे संशोधन केले ते सांगितले. बीएआरसी मध्ये जाण्यासाठी काय करावे लागेल त्याचे मार्गदर्शन ते परिवारातील तरुणांना करणार असल्याची इच्छा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

श्री. हणमंत मोरेश्वर मराठे यांनी कथाकथनाचा कार्यक्रम करून उपस्थितांचे मनोरंजन केले. 'माधुरीच्या दारातील घोडा', 'शरद पवारांचं मीठ', 'गोपीनाथ मुंडे -१ महिन्यात दाऊदला गजाआड', 'न बनेगा करोडपती', 'पु.लं.चे पदक' आणि त्रिवेदी-सुभाषसेना अशा पाच व्यंग कथा त्यांनी सांगितल्या. अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे यांच्याहस्ते ह.मो.चा सत्कार करण्यात आला.

मराठे प्रतिष्ठानला स्वत:ची वास्तू का असू नये याविषयी आपण काय करू शकतो, काय काय करायला हवे याविषयी कर्नल प्रमोदन मराठे यांनी पडद्यावर स्लाईड शो दाखविला. त्यामुळे सर्वजण विचारमग्न झाले. आत्मपरिक्षण करू लागले. आपण कुठे चुकतोय, नेमके काय करायला हवे याविषयी विचारविनिमय करणे आवश्यक ठरते. मराठे प्रतिष्ठान चांगले चालावे यासाठी काय करायची आवश्यकता आहे यासाठी कर्नल प्रमोदन मराठे यांनी वेबसाईट तयार केली आहे.

कर्नल प्रमोदन मराठे यांची आत्या श्रीमती लीला मराठे यांनी आपले मनोगत मांडले. लीला मराठे यांनी आपली तळेगाव येथील पाच हजार स्क्वेअर फूट जागा मराठे प्रतिष्ठानला देण्याची इच्छा व्यक्त केली. सर्वांनी टाळ्या वाजवून आनंद व्यक्त केला. त्यानंतर वास्तूसाठी देणग्या जाहीर करण्यात आल्या. श्री. आनंदराव मराठे पंचवीस हजार रुपये, श्री. रमाकांत विद्वांस पंचवीस हजार, सौ. नीलांबरी मराठे पंचवीस हजार, श्रीमत सुलभाताई मराठे पन्नास हजार, श्रीमती शुभदा शंकर मराठे दहा हजार, श्रीमती नंदिनी विष्णू मराठे दहा हजार, गोव्याचे श्री. नीलकंठ म. मराठे यांनी एक लाख, श्री. प्रशांत प्रभाकर मराठे पंचवीस हजार, श्रीमती साधना मराठे, नाशिक दहा हजार इ.देणग्या उपस्थितांनी मराठे प्रतिष्ठानच्या वास्तूसाठी देणार असल्याचे जाहीर केले.

त्यानंतर श्री. प्रसाद घारपुरे यांचे 'अफझलखानाचा वध' हे शिवकालिन ऐतिहासिक कथाकथन प्रभावशाली झाले. कर्नल प्रमोदन मराठे यांनी त्यांचा सत्कार केला.

सौ. प्राची मराठे यांनी 'ढग दाटूनी येतात, मन वाहूनी नेतात' आणि 'सलोनासा सजन है और में हूं' ही हिंदी गझल म्हटली. सौ. प्राची मराठे यांच्या गोड गळ्याने आणि गाण्याच्या सुरेल सादरीकरणाच्या शैलीने सर्व श्रोत्यांची

Marathe Pratishthan

मने जिंकली. सौ. प्राची मराठे ह्या मराठ्यांच्या घरातील सून आहेत. आपल्या गाण्याने त्या निश्चितच या गायनक्षेत्रात नाव कमावतील अशा अपेक्षा वाढल्या आहेत. त्यांचे माहेरचे आडनाव कोकिळ त्यांच्या गळ्याने सार्थ केले आहे.

श्रीमती साधनाताई मराठे, नाशिक यांनी स्वत: नर्मदापरिक्रमा चालत पूर्ण केली. त्यावर 'लौकिकाकडून अलौकिकाकडे... नर्मदा हरऽऽ'' हे एक अविस्मरणीय अनुभवाचे उत्तम पुस्तक लिहिले. श्रीमती साधनाताईंनी नर्मदा परिक्रमा पायी फिरून पूर्ण करताना आलेल्या अडचणी त्यावर नर्मदामाईंनी त्यांची कशी सुरक्षित सुटका केली. वाटेत सिद्धपुरुष, साधू कसे भेटले, नर्मदा मैय्याने कशा कशा रूपात दर्शन दिले, त्यांच्या मनीच्या इच्छा कशा पुरवल्या, नर्मदामाईने साक्षात्कारी दर्शन साधनाताईंना कसे दिले याविषयी मनोज्ञ, भक्तिरसात ओथंबलेली माहिती सांगताना सर्वजण समरस झाले. प्रत्येकाला वाटले आपणही नर्मदा परिक्रमा करावी यातच साधनाताईंच्या भाषणाचे यश आहे. त्यांना वेळ कमी पडला अशी खंत वाटत राहिली. डा. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे यांच्याहस्ते श्रीमती साधनाताईंचा सत्कार करण्यात आला.

चहा, नाश्ता, रुचकर जेवण यांची व्यवस्था चांगली होती. या शानदार कार्यक्रमासाठी पुणेकर तर होतेच, परंतु मुंबई कार्यकारिणील अनेक सदस्य, नाशिक, गोवा, अमरावती येथूनही काही कुलबांधव व भगिनी आवर्जून उपस्थित होते. त्या सर्वांना मनापासून धन्यवाद. नवीन वर्ष सुखाचे जावो. सूत्रसंचालन कस्तुरी मराठे हिने नेटके केले तर सौ. मंजिरी मराठे, पुणे (गायिका प्राची मराठे हिच्या सासूबाई) यांनी आयत्यावेळी यथोचित्त आभारप्रदर्शनाचे काम केले.

**- वृत्त संकलन : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, सौ. माधवी जाईल, पुणे**

## नियतीचे मायाजाल

आयुष्यातली अटळ गोष्ट म्हणजे वृद्धत्व आणि मृत्यू ह्याचं मात्र आपल्याला भानही राहत नाही. त्यासाठी एक आर्थिक बाब सोडली तर दुसरं कुठलंही प्लॅनिंग करीत नाही. 'वेळ येईल तेव्हा बघू' अशा नकळत असणाऱ्या विचाराने आपण त्या अप्रिय विषयाकडे दुर्लक्ष करतो. मात्र आयुष्य उतरणीला लागल्यावर अप्रिय विषयाकडे लक्ष जाते. मीही आज आयुष्याच्या उतरणीवर आहे.

भूतकाळाकडे वळून पाहताना जुन्या आठवणी मनात जास्तच पिंगा घालू लागतात. त्यातील दु:खाच्या आठवणी आधी येतात. आमचा मुलगा राजेश वय वर्षे चोवीस असताना १९९५साली रेल्वे अपघातात गेला. हे आम्हाला दुसऱ्या दिवशी कळले. या आकस्मिक धक्क्याने मन विकल झाले. काही सूचनासे झाले. डोके बधीर झाले. आम्ही त्याच्यासाठी काही करू शकलो नाही याची आमच्या मनात अपराधीपणाची भावना कायम घर करून राहिली. २३ डिसेंबरला त्याचा स्मृतीदिन होता. त्या निमित्ताने आम्ही नगरच्या स्नेहालय या लहान मुलांच्या संस्थेला काही देणगी रूपाने भेट दिली. आज पंधरा-सोळा वर्षे झाली. आयुष्यभर ही कटू आठवण विसरू शकणार नाही. २८ डिसेंबर २०११ अनुज बिडवेची ब्रिटनमध्ये हत्या झाली. त्याच्याच्या आई-वडिलांवर दु:खाचा डोंगर कोसळले. तेवीस-चोवीस वर्षांच्या तरुणवयात मुलामुलींना अपघाताने किंवा हत्येने मृत्यू येणे ही गोष्ट आईवडिलांना अत्यंत क्लेशदायक असते.

मृत्यू अटळ असला तरी तरुण वयात येऊ नये असे वाटते. हत्या, अपघात अशा बातम्या ऐकून मन विषण्ण होते. अशाप्रकारे नियतीने दिलेल्या फटकाऱ्याने मन अगतिक होते.

या विचलित झालेल्या अवस्थेला मोठ्या हिमतीनं सामोरं जायला लागतं. मनाची समजूत घालताना गीत रामायणातल्या ओळींची आठवण येते

*जरा मरण यातून सुटला कोण प्राणिजात। दु:ख मुक्त जगला कारे कुणी जीवनात।।*

**- सौ. रोहिणी विजय मराठे**

११/२ शारदा सेंटर अपार्टमेंट, फ्लॅट क्र.४, एरंडवणा, पुणे ४११ ००४
फोन : ०२०-२५४४१८०८

## अजित मराठे यांना पीएचडी

'निर्माण ग्रुप'चे व्यवस्थापकीय संचालक अजित मराठे यांना 'ब्रँड इक्विटी मॅनेजमेंट इन रिअल इस्टेट बिझनेस इन मुंबई मेट्रोपोलिटन रीजन' या विषयात पीएच.डी. मिळाली आहे. मुंबई विद्यापीठातील कॉमर्स विभागाचे प्रमुख डॉ. विवेक देवळाणकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हा प्रबंध सादर केला. एकविसाव्या शतकातील रिअल इस्टेट उद्योगात ब्रँड इक्विटी मॅनेजमेंटचे तंत्र, व्यवस्थापनातील डावपेच, व्यूहरचना, कार्यक्षमता इत्यादी विषय मराठे यांनी आपल्या प्रबंधात अधोरेखित केले आहेत. ब्रँड इक्विटीचे तंत्र या उद्योगात वापरले असता वेगाने प्रगती होत असल्याचे त्यांनी सिद्ध केले.

मराठे प्रतिष्ठानद्वारा श्री. अजित मराठे ह्यांचे हार्दिक अभिनंदन!



Marathe Pratishthan

# गोष्ट साधीच, पण...

**ना. ज. जाईल**

एखादा दिवस असा येतो की मनासारखं काहीच घडत नाही. प्रत्येक वेळी दान उलटं पडतं. कुंडलीतले सारे ग्रह वक्री असतात. काय करावं हेच कळत नाही. आणि तसं पाहिलं तर घडणारी घटना ही साधीच असते पण -

आणि या 'पण'पाशीच आपले विचार थांबतात. कारणमीमांसा तोकडी पडते. आपण उरतो फक्त एक नि:शब्द प्रेक्षक. त्या दिवशी असंच झालं. मी तेव्हा दिल्लीला राहात होतो तिथे जाऊन तीन वर्षे झाली होती. त्यामुळे बऱ्यापैकी स्थिरावलो होतो. जागा मिळाली होती करोलबागेत - लिबर्टी थिएटसमोर माझं ऑफिस होतं पार्लमेंट स्ट्रीटवर, बसने जाण्यासारखं. माझी मुलगी चार वर्षांची असेल. तिला बिर्लामंदिराजवळ सेंट थॉमस शाळेत प्रवेश मिळाला होता. मी, माझी पत्नी आणि आमची छोटी मुलगी... आमचे दैनंदिन कार्यक्रम सुरळीत चालले होते. आणि एक दिवस तो 'पण' आडवा आला.

रविवारची सुट्टी शांतपणे घालवली. दुपारचे जेवण हे यथातथाच झालं होतं. त्यामुळे रात्रीचं जेवण हे साग्रसंगीत हवं असं मी दुपारचा चहा घेताना पत्नीला बजावून सांगितलं. पण पुष्कळवेळा आपल्या हातात फक्त कुठलाही कार्यक्रम ठरविणं तेवढंच असतं. कारण तो कार्यक्रम पार पडणं किंवा न पडणं हे इतर अनेक बाबींवरच अवलंबून असतं. त्या दिवशी असंच झालं. दुपारी चहा घेऊन कप खाली ठेवला तेवढ्यात बाहेर काहीतरी गडबड झाली. बाहेर येऊन पाहतोय तर प्रकार गंभीर होता. वरच्या मजल्यावर राहणाऱ्या चतुर्वेदी गावाला गेले होते. त्यांची पत्नी रडत होती. शेजारधर्माला जागून मीच पुढे झालो आणि आणखी दोघांच्या मदतीने त्याला हॉस्पिटलमध्ये घेऊन गेलो. वेळेवर मदत मिळाली. वेळ चांगली त्यामुळे संकट टळलं. श्रीमती चतुर्वेदींनी माझे पुन: पुन: आभार मानले. घरी आलो तेव्हा घड्याळात साडेबारा वाजले होते. अर्थात साग्रसंगीत जेवणाचा कार्यक्रम रद्द झाला होता. झोपण्यापूर्वी एक भांडभर पाणी प्यायलो. उपाशीपोटी तसाच झोपलो. निद्रादेवीची आराधना करीत. दुसरा पर्याय नव्हताच

दुसऱ्या दिवशी सकाळी उठलो तेव्हा स्वयंपाकघरातून खमंग वास आला. माझी पत्नी शिरा करीत होती. पोट रिकामं होतं. भूक मी म्हणत होती. त्या खमंग वासामुळे तोंडात शिऱ्याची चव मुक्तपणे भरतनाट्यम् करू लागली. मी पुढे होऊन म्हणालो, ''वा वा... शिरा म्हणजे-''

''काल जेवण झालं नाही म्हणून रात्री झोपतानाच ठरवलं.''

''फर्स्टक्लास झकास.... तयार होऊन येतोच समाचार घ्यायला.''

असं म्हणून मी बाथरूमच्या दिशेने निघालो. सोमवारचा दिवस असल्यामुळे ऑफिसात दहा मिनिटं अगोदर जाणं आवश्यक होतं. अंघोळ करताना, कपडे घालताना... जिभेवरील शिऱ्याची चव अधिक गडद होत गेली. तोंड वेलचीच्या वासानं ओतप्रोत भरलं होतं. मी डायनिंग टेबलाच्या दिशेने निघालो तेवढ्यात दारावरची बेल वाजली. दरवाजा उघडला, समोर माझा सहकारी कोहली उभा होता.

''नमस्ते... क्या बात है कोहली?''

मी स्वाभाविक चौकशी केली. कारण त्याचं येणं हे सर्वस्वी अनपेक्षित होतं. कुठलाही संदर्भ लागेना आणि माझ्या मनात 'शिरा' हा एकमेव विषय ठाण मांडून बसला होता.

''यार सुबह सुबह सहगलसाबका फोन आया था। उनको कुछ काम है. ऑफिस देरसे आनेवाले है, इसलिये आय.आय.टी हम दोनोंको जाना है। जल्दी तैयार हुआ और तुरंत स्कूटर लेकेही निकला।''

कोहलीने खुलासा केला. साहेबाची सूचना म्हणजे ती आज्ञाच त्याला पर्याय नसतो त्यामुळे शिरा खाण्याचा कार्यक्रम रद्द करावा लागला. तरी माझ्या पत्नीने पुढे येऊन विचारलंच,

''भाईसाब, कुछ नाश्ता...चाय..''

परंतु तिचं बोलणं पूर्ण होण्यापूर्वी कोहली म्हणाला, ''नही बहेनजी, आज तो बिलकुल टाईम नही है। पहलेही हमको लेट हुआ है इसलिये माफी चाहता हूं।''

शेवटचा प्रयत्नही फसला होता. त्यामुळे मी कोहलीबरोबर तसाच - उपाशीपोटी बाहेर पडलो. त्या गडबडीतही लंचबॉक्समध्ये शिरा भरून बॅगमध्ये ठेवायला ती विसरली नाही. तेवढीच मनावर फुंकर होती. मनात विचार आला की दिवसभरात केव्हातरी संधी प्राप्त होईल आणि आपण त्या लंच बॉक्सचा समाचार घेऊ. त्याक्षणी तरी माझं तेच स्वप्न होतं. म्हणतात ना - शेवटी माणूस स्वप्नांवरच जगतो, परंतु त्या दिवशी माझ्या कुंडलीतल्या सर्व ग्रहांनी संपूर्ण असहकार पुकारला होता. आय.आय.टी मधील काम लांबलं. दुपारी मोठ्या मुश्किलीनं एक कप चहा घेण्यापुरता वेळ मिळाला. नंतर ऑफिसातून फोन आल्यामुळे दुपारी चार वाजता ऑफिसात पोहोचलो. तिथेही मीटिंग, चर्चा... दोन तासाहून अधिक वेळ त्यात गेला. बॅगेत लंच बॉक्स आहे याची तापदाक आठवण अधूनमधून झाली परंतु काही कृती करणं केवळ अशक्य होतं. ऑफिसातून बाहेर पडलो तेव्हा घड्याळात साडेसहा वाजून गेले होते. मी कॅनॉट प्लेसपर्यंत आलो आणि नशिबाने बस मिळाली. विशेष म्हणजे फार गर्दी नसल्यामुळे बसायला जागा मिळाली. मग मात्र माझा धीर संपला. आणि त्याक्षणी मी डबा काढून खाण्याचा निर्णय घेतला. मी बॅग उघडली आणि लंच बॉक्स बाहेर काढणार होतो तेवढ्यात -

''क्यो साब आज देर से निकले''

माझ्या खांद्यावर हात ठेवीत अगरवाल बोलला. तोही माझ्या घराजवळच रोहतक रोडवर राहत होता. तीन-चार बिल्डिंग पलीकडे मी त्याच्याकडे पाहून केविलवाणं हसलो. कारण काहीच करणं शक्य नव्हतं. बॅग बंद केली. कारण तोही शेवटच्या स्टॉपवरच उतरणार होता. त्याच्या प्रश्नांना उत्तरं देत होतो. बस शेवटच्या



Marathe Pratishthan

स्टॉपवर थांबल्यावर दोघेही खाली उतरलो. आणि त्याचा निरोप घेऊन जड पावलाने घराकडे निघालो. घरी पोहोचल्यावर पत्नीला सर्व हकिकत सांगितली. पोटात कावळे एक सुरात ओरडत होते. तिने मला धीर देत सांगितले की अर्ध्या तासात कुकर होईल मी बॅग ठेवली आणि अंघोळ करण्यासाठी बाथरूमच्या दिशेने निघालो. माझी छोटी मुलगी शेजारी राहणाऱ्या सरदारजींच्या घरात होती. एरवी ती बऱ्याच वेळा चतुर्वेदींच्या घरी खेळायला जायची. पण त्यादिवशी चतुर्वेदींचं घर बंद होतं. मी अंघोळ करून बाहेर आलो तेव्हा तिचं बोलणं कानावर आलं. ती सरदारजींच्या पत्नीला सांगत होती,

''आंटीजी, हम लोग आज रातका खाना नही खायेंगे।''

त्यावर सरदारजींच्या पत्नीने विचारलं, ''लेकीन मुन्नी, तुम्हारी मम्मी तो खाना पका रही है''

त्यावर तिने ठसक्यात उत्तर दिलं, ''तो क्या हुआ. पका रही है मगर हम खायेंगे कल... आज नही. स्कूलमे भी टीचरने बताया है. शास्त्रीजीने कहा है...''

ते बोलणं ऐकल्यावर मला आठवलं. त्यावेळचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी आठवड्यातून एकदा - सोमवारी रात्री जेवण न घेण्याचं आवाहन साऱ्या राष्ट्राला केलं होतं. म्हणजे मलाही ती हेच सांगणार की काय... मी थोडा गडबडलो. तिला पटवायला हवं... पण कसं? कारण लहान मुलं म्हणजे निरागसतेचं प्रतीक. अंतर्बाह्य मोकळी आणि निष्पाप. पोटात तेच ओठात हे तत्त्व कटाक्षाने पाळणारी. मी कपडे करून स्वयंपाकघरात गेलो तेवढ्यात ती आली आणि म्हणाली,

''बाबा, आज आपण जेवायचं नाही ना.''

''हं.''

''मग आई स्वयंपाक का करत्ये.''

मी तिला गमतीने म्हणालो, ''अगं आपण दरवाजा बंद करून जेवायचं. म्हणजे कुणालाच कळणार नाही. चालेल ना.''

पण माझं तर्कशास्त्र तिला कळत नव्हतं. पटत तर मुळीच नव्हतं. ती न जेवण्याचा आग्रह पुनः पुनः करीत होती. आमची चर्चा थांबत नाही हे लक्षात आल्यावर माझ्या पत्नीने तिला समजुतीच्या स्वरात सांगितलं.

''हे बघ, आज बाबा जेवलेच नाहीत. दिवसभर उपाशीच होते. मग त्यांना भूक नाही का लागणार-''

''पण मग मी शाळेत कसं सांगणार की आम्ही काल रात्री जेवलोच नाही.''

''तसं सांगायचं, कोण पहायला येणार आहे?''

''म्हणजे खोटं बोलायचं?''

त्या प्रश्नाला माझ्या पत्नीकडे उत्तर नव्हतं. काय बोलावं हेच तिला कळेना आणि त्यामुळे ती काहीशी चिडलीही. पण काहीतरी बोलायलाच हवं म्हणून ती रागावली. त्याचा विपरीत परिणाम झाला आणि छोटीने भोकाड पसरलं. ती मुसमुसून रडत होती आणि मध्येच काहीतरी सांगत होती. तिला माझ्याशी बोलायचं होतं मी तिला उचलून कडेवर घेतली आणि बाहेर गॅलरीत आलो. तिला मांडीवर घेतली. ती बोलत होती आणि मी तिला थोपटत होतो. मी जेवणार नाही असं तिला निक्षून सांगितल्यावर तिचं रडणं थांबलं. आणि बोलता बोलता ती केव्हा झोपली ते कळलंच नाही.

''हे काय, झोपली की काय''

माझ्या पत्नीने गॅलरीत येऊन विचारलं. तिला उठवावं असंही तिने सुचवलं. पण मी छोटीला उठवलं नाही. तिला अलगद कॉटवर ठेवलं. आणि आत गेलो. माझ्या पत्नीने शिरा गरम केला आणि ताटली भरून माझ्यासाठी आणला.

''उशीर झालाय खरा... पण तुम्ही खा. दिवसभर काहीच खाल्लं नाही तुम्ही.''

''नको गं...''

''आता तर ती झोपली आहे ना. मग झालं तर. उद्या सांगा तिला जेवलो नाही म्हणून.''

मी तिला विचारलं.

''खोटं सांगायचं तिला''

छोटीनं मला विचारलेला प्रश्न मी पुनः तिला विचारला. तिच्याकडे उत्तर नव्हतं. दोन मिनिटं तशीच गेली. मग तिनं स्वयंपाकघरातला पसारा आवरला आणि बाहेर येऊन बसली. जेवणाच्या टेबलावर पाण्याने भरलेलं लोटीभांडं होतं. मी भांड्यात पाणी घेतलं आणि घोट घोट पीत होतो. त्या पाण्याला वेगळीच चव लागली. विशेष म्हणजे भांडभर पाण्याने मला ढेकर आली. तृप्तीची आणि समाधानाची. एरवी झोपेची आराधना करावी लागते पण त्या दिवशी मात्र गादीला पाठ लावताच गाढ आणि शांत झोप केव्हा लागली हे कळलंच नाही.

**-श्री. ना. ज. जाईल (पृ.७५५)**
१२, साधनासदन, नौपाडा हायवे सोसायटी,
एस. व्ही. रोड, नौपाडा
ठाणे (प.) ४०० ६०२ फोन -०२२-
२५४०६७१७

## मानसन्मान

जयंत रघुनाथ मराठे, पर्वती, पुणे यांची कन्या (मराठेंची माहेरवाशीण) सौ. ज्योती मिलिंद आपटे हिने नुकतीच मास्टर ऑफ कॉन्सिलिंग (Counselling) अँड सायको थेरपी ही पदवी प्राप्त केली असून ती पहिल्या वर्गात पास झाली आहे.

सौ. ज्योती हीचे मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक अभिनंदन!

## साहित्यासाठी आव्हान

अपत्यप्राप्ती, जन्म-मृत्यू, परीक्षेतील यश, कला-क्रीडा, सामाजिक सेवा, समाजकार्यातील प्रगती, पदोन्नती, विवाह, परदेशगमन इ. आपल्या कुटुंबातील महत्त्वाच्या घटनांची माहिती 'हितगुज'मध्ये प्रसिद्धीसाठी पाठवावी. तसेच कथा, कविता, निबंध, ललित, वैचारिक साहित्य, विनोद, पाककृती, सुविचार इ. साहित्य पाठवावे ही विनंती.

Marathe Pratishthan

# नातवाने बर्लिनहून आजीला वाहिलेली श्रद्धांजली

*चि. नीरज हेमंत मराठे (पृ.३८०) सध्या जर्मनीत बर्लीन येथे मेकॅनिकल इंजिनियअरिंगचा मास्टर डिग्रीचा अभ्यास करीत आहे. त्याने आजीच्या प्रथम स्मृतीदिनी बर्लिनहून ई-मेलने श्रद्धांजली वाहिली. त्यात त्याने भावपूर्ण हृदगत व्यक्त केले आहे. (हितगुजचे लेखक श्री. सदाशिव बळवंत मराठे, बडोदे यांचा नीरज हा नातू आहे.)*

January 2012
The Grand Favourite Story-teller!
Posted : January 13, 2012 in Uncategorie
Niraj H. Marathe

It's almost as if God made the word himself for the role. No other title justifies its benefactor as truly as this : Grandmother. Someone who is grander than the mother herself. None has a better title.

I fondly remember when me and my brother would eagerly follow her evening prayers. Not that the prayers of devotion were of any interest. What followed was an hour long story-telling sessions. The topics ranging from mtyhology, history, India's freedom struggle to more personal family moments which happened in front of her eyes. So while on most of the days me and Aditya enacted Ram and Krishna for her bhajans or stories of Ramayana and Mahabharat, there were evenings when we just won't let her go without telling us about her childhood. The wide-eyed gazes stared into the world brought alive by those detailed build-ups of the stories, which came so naturally to her. I was always amused by her effortlessness when narrating any of it. It's amazing how when mothers are experts at visualizing the future for us during upbringing, grandmothers take us through the entire history of the family, region or country through some simple and crisp story-telling. It's almost subconscious the way she passed on the awareness of where we come from through her narratives.

I believe that grandmothers are different people when they are grandchildren. For them no one can better their grandchildren, For them grandchildren are better than their own children. For them the grandchildren are always right. I cannot remember how many times we have got away clean with her help. If there was any protecting cover for mischief, it was her lap. It was almost as if grandmothers wish their grandchildren turn out better people than their own children have turned out to be On a more serious note, I believe with no pressure of being a parent,m grandmothers can only deal in love minus all the expectations and practicalities involved with growth of grandchildren.

One of the fondest habits was sitting on her lap or resting my head on it. There's no better comfort in this world. It's no wonder that we brothers used to fight for the "Singhaasan". We even fought for the place next to her on dining table. She played such an integral role in the cousin-rivalry we shared, I producing good results in tests and exams was worth it all for that enthusiastic pat and hug. Achievements mattered most when that face gleamed with pride.

Now, often it is unbelievable that it has been a year since she stopped existing. The concerned voice, the toothless grin, the culinary expertise, the childlike laughter, the thin grey hair, the encouraging pat, the comfort of the lap, the recounting of the past life, all ceased to be.

Still her voice rings in somewhere. The toothless grin flashes every now and again. The pat is felt for ever little thing done right. The stories still linger somewhere, only to be recounted on days like these...

Probably, it's the power of her story telling that I can still imagine the things that don't exist.

After all she was not just a mother, She was grandmother!

**- नीरज हेमंत मराठे (पृ.३७)**

Marathe Pratishthan

# मराठीचं भूत

**मृदुला सुहास मराठे**

हल्ली रोज माझी नाक्या नाक्यावर भांडणं होतात. अहो मी मूळात भांडखोर नाहीच. हे मराठीच 'भूत' माझ्या डोक्यावर स्वार झालंय ना त्याचा हा परिणाम. तुम्हाला सांगतेच सविस्तर!

त्या दिवशीचा पहिला प्रसंग : केळीवाल्या भैय्याची गाडी : मी आणि जोशीकाकू

भैय्याशी मोडक्या तोडक्या हिंदीत जोशीकाकू "भैय्या, केला कैसा दिया रे?"

मीही तिथेच केळी घेत होते. मी विचारले,"केळी कशी दिली?" मी मराठीतून विचारले. जोशीकाकू हिंदीतून बोलल्या. हे ऐकून माझं डोकं गरम झालं. मी त्यांना म्हटलं, "अहो जोशीकाकू, मराठीत बोला ना त्याच्याशी मग तो पण मराठीत बोलेल. तुम्हीच हिंदीतून सुरू होता, मग तो कशाला मराठीतून बोलेल. तुम्ही मराठीतून विचारा, 'केळी कशी दिली?' आपल्या महाराष्ट्रात आपण मराठीच बोलूया."

आधीच त्या जोशीकाकूंचं आणि माझं थोडंसं खटकलं होतं उत्सवाच्या वर्गणीवरून त्यात मी त्यांना हे सुनवलं झालं. त्या जाम उखडल्या आणि म्हणाल्या, "हो आलीये मोठी मला अक्कल शिकवायला. सारखी मराठी मराठी करत असतेस, आणि तुझी मुलं त्या इंग्रजी शाळेत घातलीस ना?" मी समजुतीच्या स्वरात म्हणाले, "अहो काकू, इंग्रजी ज्ञानाची भाषा आहे. मला येत नाही म्हटलं मुलं शिकू देत म्हणून त्यांना इंग्रजी शाळेत घातलं." झालं वाद वाढत चालला. शब्दानं शब्द वाढला. आणि शेवटी तो केळीवाला भैय्या मधे पडला. मला समजावत म्हणाला, "बहेनजी, शांत हो जाईये।" झालं मी आणखी भडकले. आता मी त्याच्यावर चिडले, "तू गप्प बस रे XXX आमच्या इथे येऊन आम्हाला अक्कल शिकवतोय."

आमची दोघींची जाम खडाजंगी चालू झाली. आवाज वाढत चालले. रस्त्यावर ही गर्दी जमली. शेवटी नाक्यावरच्या तरुण उत्साही मुलाने मध्यस्थी करून प्रकरण मिटवलं.

हे असं रोजचं चाललंय!

प्रसंग दुसर : रिक्षावाला आणि मी

"मी रिक्षा डावीकडे घे" असं सांगितली तर त्याने उजवीकडे घेतली. झालं! माझं मी जोरात विचारलं, "अहो, मी डावीकडे रिक्षा घ्यायला सांगितली ना!"

रिक्षावाला म्हणाला "बहेनजी, मुझे मराठी नही आती।" मी "इथे काय मग मरायला आलास. इथे धंदा करतोस तर मराठी नाही शिकून घेता येत?"

रिक्षावाला जरा उर्मटच होता. रिक्षातून उतरून तो एकदम रागानेच म्हणाला, "नही बोलेगा मराठी। नही सीखेगा मराठी। क्या करोगे?"

माझं पित्त खवळलं, "नाही बोलणार मराठी, नाही शिकणार मराठी, म्हणजे काय! शिकलंच पाहिजे, बोललंच पाहिजे. इथे महाराष्ट्रात येता, राहता, धंदा करून पैसे कमवता ते आमच्या मराठी माणसांकडून आणि मराठी बोलत नाही. याला काय अर्थ आहे?"

रिक्षावाला अजूनच उद्धटपणा करू लागला व म्हणाला, "आप मेरा कुछ नही बिघाड सकती है। मेरे पास लायसन्स है, रेशनकार्ड है। सब है मेरे पास।" त्याचं ते हिंदीतल्या हिरोसारखं 'मेरे पास गाडी है, बंगला है।' वगैरे वगैरे ऐकून माझा राग वाढला. मी एकदम शिव्याच द्यायला सुरुवात केली, "XXX XXX कुणी रे दिली तुम्हाला रेशनकार्ड? कुणी रे दिली तुम्हाला लायसन्स?आमच्या महाराष्ट्रात येऊन आमच्यावर दादागिरी!" हे प्रकरण पेटलं. आजूबाजूच्या लोकांच्या लक्षात आलं, गर्दी जमली. तशी त्या रिक्षावाल्याने हळूच काढता पाय घेतला. कारण आणखी हे पेटलं तर! याचा अंदाज त्याला आला.

रोजचं हे असं घडत होतं.

त्या दिवशीची गोष्ट, आम्ही मैत्रिणी उपहारगृहात गेलो होतो. यादी पाहून आम्ही पदार्थ मागवले. पदार्थ देणारा अमराठी होता. त्याला आम्ही "कढी भात" आणायला सांगितला. प्रत्यक्षात त्याने 'करी राईस' आणला. झालं! मी जोरात ओरडले "ही करी कशाला आणलीस? मी कढी मागवली." त्यावर तो म्हणाला, "बहेनजी, आपने 'करी राईस' बोला." रिकाम्यापोटी मी आणखी चिडले. तो ऐकेना आणि मी पण हट्टाला पेटले.

मी, तो पदार्थ देणारा व्यवस्थापक सर्वांचे आवाज वाढले. आणि भांडण रंगायला लागले. इतर गिऱ्हाईकावर परिणाम व्हायला नको म्हणून शेवटी व्यवस्थापकाने माझी माफी मागितली. प्रकरण मिटले.

त्या 'मराठीच्या भूता'ने माझी मानगूट चांगलीच पकडली आहे. अहो ह्या २०११चा संकल्पच माझा आहे की सगळं सगळं फक्त मराठीतून बोलायचं. रोज रोज मी सकाळ-संध्याकाळ आता अभ्यास करते. एखादा शब्द माझ्यासमोर कुणी इंग्लिश अगर हिंदीतून बोलला. तर लगेच माझं डोकं गरम होतं. भाषांतर करून त्याला लगेच दुरुस्ती करायला लावते. अहो ह्या प्रकारामुळे माझी भांडणं, कटकटी रोज वाढत चालल्येत. ऐका परवाचीच गोष्ट.

मी दळण घेऊन गिरणीत चालले होते. माझ्याबरोबर माझ्या शेजारच्या 'बिना आंटी' पण होत्या. त्या बिना आंटी म्हणाल्या, "दो दिनसे आटा नही है घरमें. हररोज मैं भूल जाती हूँ। चलो एक साथ चक्कीमें जाते है।"

मी म्हणाले, "आहे बिनाजी तुम्ही एवढे वर्ष इथे महाराष्ट्रात राहता अजून 'आटा', 'चक्की' असे म्हणता पीठ, गिरणी हे म्हणायला तुमची जीभ काय जड होते?" म्हणा मराठीत, "दोन दिवसापासून मी गहू दळायला विसरते आहे." झालं! मी त्यांना मराठीत बोलायला शिकवलं तर त्या जाम चिडल्या माझ्यावर. मग लागलो मी आणि त्या भांडायला. मागचं-पुढचं सगळं निघालं. पूर्वी माझी मुलं लहान असताना त्यांच्याकडे इंग्रजी शिकायला जात असत. मी



Marathe Pratishthan

पूर्वी वरतीच राहणाऱ्या गुजराथी घरी गुजराथी शिकायला जात होते. ते सगळं त्यांनी काढून त्या भांडायला लागल्या. वाट्टेल तसं बोलल्या.

मी घरी आल्यावर सगळं मुलांना सांगितलं त्यावर मुलंही मला बोलली, ''आई काय गरज होती? जिथे तिथे मराठीचा अभिमान जागवायची? रोज वादावादी करत असतेस.'' मुलं बोलली तरीही मी ऐकत नव्हते. मी मुलांशी भांडले. ''अरे असं कसं म्हणता? मराठी प्रांतात राहून मराठीचा अभिमान नको? इंग्रजांना चलेजाव केलंत ना! स्वातंत्र्य मिळालं. तरी अजून तुम्ही त्यांच्या भाषेचे गुलाम आहात.''

मुलं म्हणाली, ''मग आम्हाला इंग्लिश शाळेत कशाला घातलंस?''

मी म्हणाले, ''अरे ती ज्ञानाची भाषा आहे. व्यवहारात तुमचं आडू नये म्हणून. अरे भाषेवर राग नाही माझा. सर्व भाषा मला आवडतात. उगाचच गरज नसताना कशाला इंग्रजी, हिंदी भाषेत बोलायचं?'' मी मुद्दा पटवून देत होते पण कुणी ऐकायला तयार नव्हतं. तरीही मी भांडतच होते. माझ्या डोक्यावर मराठीचं भूत स्वार होतं ना! माझं चालू झालं, ''तिकडे दक्षिणेत पहा! ते लोक त्यांच्याच भाषेत बोलतात. अंडूगंडू करतात, तुम्हा आम्हाला काही स्वत्वचं राहिलं नाही. समोरचा मराठी बोलत असला तरी तुम्हीच 'भैय्या, कितना हुआ पैसा?' 'भैय्या, ये पत्ता बता दो' वगैरे वगैरे. 'किती झालेरिक्षाचे पैसे?', 'हा पत्ता सांगाल जरा?'' असे बोलायला काय जीभ झडते का? अरे आपली मातृभाषा आहे. तिचा मान ठेवायला नको? इंग्रजीत 'येस फेस' केलंत म्हणजे काय जग जिंकलंत की काय? काय कमी आहे आपल्या भाषेत? (आता मी माझं ज्ञान उधळू लागले.) सांगा 'नेसणे' या शब्दाला इंग्रजीत योग्य समर्पक शब्द आहे? (मी शब्दकोश काढून दाखवलं.)

''ज्ञानेश्वरीसारखा सुंदर रसाळ ग्रंथ अवघ्या अठरा-एकोणिसाव्या वर्षी ज्ञानेश्वर माऊलींनी लिहिला. त्याचा अभ्यास अमेरिका, रशियात चालला आहे. तो कशाला? भाषा गोड, उत्कृष्ट आहे म्हणूनच ना? परदेशात कुणी ह्याचा अभ्यास केला की आम्हाला आमच्या भाषेची महती पटते. पण आम्ही नुसतं म्हणतो ''वा! छान!!''

माझा मराठीचा जाज्वल्य अभिमान जागा झालेला पाहून मुलं दचकली. आणि मागच्या मागे पसार झाली. हळूहळू मी भानावर आले. आणि माझ्या घरात आकाशवाणीवर 'पसायदान' लागले होते. ते कानावर आलं आणि मी शांत झाले. आणि मराठी भाषेची समृद्धी व्हावी म्हणून प्रार्थना करू लागले.

**- श्रीमती मृदुला सुहास मराठे**
**(पृ. २७७)**
'कैलास', विष्णूनगर, नौपाडा, दुसरी गल्ली
ठाणे (प.) - ४००६०२
फोन : ०२२-२५४३३९२३

## Thank You God!

*I thank you god for these beautiful days*
*Which I am enjoying in the wonderful ways*
*All the twenty four hours I am in my own world*
*Listening to the nature's each sweet word*

*I could see the cute children playing*
*I could hear the small stream flowing*
*I like to watch little flowers blooming*
*Absolutely, I have no reason for complaining*

*All my relations give me great delight*
*My kind friends look at me with faces bright*
*Being a senior citizen I have limitations no doubt*
*But with your blessings I overcome them no doubt*

*Hence, I Thank God again,*
*Would U please shower your blessings now and then?*
*Please change the harmful thoughts into kind ones*
*And make our mother nature a beautiful one.*

**- Shyamala Purandare (पृ.७५५)**
27 B, Vrindavan Panchvati, Pashan, Pune 411 005
Phone : 020-25898534/9422521724



Marathe Pratishthan

# कै. श्री. सदानंद कृष्णाजी मराठे : यशस्वी, बहुविध व्यक्तिमत्त्व

सौ. आशा सोवनी (पृ.२८५), पुणे



माझे बाबा श्री. सदानंद कृष्णाजी मराठे त्यांनी आमचे आयुष्य इतके व्यापले आहे की ते आता नाहीत ही कल्पनाही सहन होत नाही. परप्रांतात स्थायिक होऊन तिथल्या समाजाशी मिसळून मानाचे स्थान कर्तृत्वाने मिळवलेले माझे बाबा!

त्यांचा जन्म कोल्हापूरला ११-११-१९३८ रोजी झाला. वडील वकील व सावकार होते. पाच मुलींनंतरचे हे पुत्ररत्न अंशत: एकत्र कुटुंबात बालपण गेले. त्यामुळे भरपूर भावंडं - ११ चुलत भावांची क्रिकेट टीमच होती. कोल्हापूरच्या पाटणकर हायस्कूलमध्ये शिक्षण व राजाराम कॉलेजमध्ये प्रथम-द्वितीय वर्ष झाले. अन् दुर्दैवाने त्यांच्या आईचे निधन झाले. त्यामुळे हुबळीचे प्रसिद्ध सर्जन डॉ. जोशी या त्यांच्या मामांकडे ते आले. तेथील इंजिनिअरींग कॉलेजमधून डी.सी.ई. प्रथम श्रेणीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. प्रथमपासूनच धंदा करण्याकडे कल होता. त्यामुळे एका इंजिनिअरकडे फक्त सहा महिने नोकरी केली व अवघ्या २१व्या वर्षी धंद्याला सुरुवात केली.

हुबळीला हौसिंग सोसायटीची घरे व काही खाजगी घरे बांधली. नंतर पुण्याला रेल्वे ब्रिजची कामे करण्यासाठी गेले. पण अनुभव कमी त्यामुळे नुकसान झाले. वाटणीला आलेला एक मोडका ट्रक घेऊन चार वर्षांनी हुबळीला परत आले. तिथून मात्र कधीच मागे बघितले नाही. प्रगतीचा आलेख उंचावतच राहिला. अखंड कामे चालू असत. एकावेळी पाच-सहा गावात कामे चालू असत, पण हे सर्व त्याकाळी कॉम्प्युटर-मोबाईल नसातानाही व्यवस्थित सांभाळण्याचं कसब त्यांच्याकडे होतं. साइटवर एखादी बुट्टी वाळू-खडी-सिमेंट कमी झाले तरी लक्षात येण्यासारखी नजर तीक्ष्ण होती व तशी यंत्रणा बसवली होती. काम सुरू होण्यापूर्वी म्हणजे सकाळी सात वाजताच मालकाची साईटवर फेरी व रोज झोपण्यापूर्वी हिशेब हे त्यांच्या यशाचे सूत्र होते. कामाला लागणाऱ्या सामानाचा अंदाज इतका अचूक असे की ६०-७० लाखाच्या कामात सहा दगड फक्त उरले होते. त्यामुळे पुढे अनेक सामाजिक संस्थांशी सबंध आल्यावर तिथला गैरव्यवहार त्यांना खपत नसे. कामे वेळेपूर्वी पूर्ण करून ताबा दिल्याबद्दल अनेकवेळा सत्कार होऊन कौतुक झाले आहे. आजही हुबळीत हिंडताना हे बाबांनी बांधले, हे कॉलेज बाबांनी बांधले अशा अनेक इमारती आम्हाला आठवतात.

हा झाला त्यांचा मुख्य व्यवसाय पण दुसरा जिव्हाळ्याचा विषय म्हणजे बँकिंग. त्यात मनाने इतके गुंतलेले असत की हा गृहस्थ इंजिनिअर, कॉन्ट्रॅक्टर की बँकर असा प्रश्न पडे. हुबळी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेसाठीचे त्यांचे योगदान फार मोलाचे आहे. वीस वर्षांहून अधिक काळ, अगदी बँकेच्या शतकपूर्तीसमारंभापर्यंत त्यांनी चेअरमनपदाची धुरा समर्थपणे सांभाळली. त्यातले दैनंदिन प्रश्न, अडचणी, त्याची सोडवणूक यात ते सतत इतके गुंतलेले असत की अर्बन बँक की मराठे बँक असे गमतीने म्हणत. काही वर्षांपूर्वी सहकारी बँकांना त्यांच्या धोरणामुळे फार वाईट दिवस आले होते. रोज कोणती ना कोणती बँक बुडाल्याच्या बातम्या येत. त्यावेळी आपल्या हुशारीने सभासदांच्या सहकार्याने अनेक धोरणे, योजना राबवून बँकेला उत्तमप्रकारे वाचवले. त्या वर्षी फायदा जाहीर करणारी हीच एक बँक होती. त्याबद्दल या कामाची वरपर्यंत दखल घेतली गेली. सहकारी बँकांच्या फेडरेशनमध्ये नावाने उल्लेख होऊन खूप कौतुक झाले.

हे सर्व करत असतानाच त्यांचे सामाजिक जीवनही तसेच आकाराला येत होते. १९८२ साली रोटरी क्लबची अध्यक्षपदाची धुरा 'सामाजिक वनीकरण' हा प्रकल्प घेऊन समर्थपणे सांभाळली. सवाई गंधर्व हॉल, अकॅडमी ऑफ परफॉर्मिंग आर्टस या संस्थाचे मॅनेजिंग डायरेक्टर होते. चित्पावन संघ, महाराष्ट्र मंडळ या संस्थांशीही संलग्न होते. मोठ्या शिक्षण संस्थांची कामे पैसे न घेता केली आहेत. शाळांच्या सुरुवातीच्या कठीण काळात खोल्या बांधून दिल्या आहेत. कॅन्सर हॉस्पिटलमध्येही थोडे बांधकाम करून दिले. ज्या शाळेत ते शिकले त्या पाटणकर हायस्कूलला वडिलांचे नावे खोली बांधून दिली.

या सर्व सामाजिक उलाढालीत लोकांचा विश्वास व प्रेम लाभले. पुष्कळदा घरमालक परगावी असत. बाबांकडे चेकबुक सही करून देत. मालक एकदम वास्तुशांतीलाच यायचे. इतका विश्वास की कुठे बेशिस्त नाही, की फसवणूक नाही. चोख हिशेब इथे जातीय दंगली उद्भवल्या असता कित्येक मुस्लिम बांधवांना साईटवर सुरक्षित राहायला सोय करून दिली आहे. सांगितलं तर खरं वाटणार नाही, पण रमजानला आमच्याकडे आठ-दहा लिटर शिरकुंबा सहज यायचा. इतकं कशाला ठेवायचं म्हटलं तर म्हणत लोक इतक्या प्रेमानं देतात की, त्याचा अपमान करू नये.

बाबांचं व्यक्तिमत्त्व तरतरीत, रुबाबदार व नावाप्रमाणे आनंदी होतं. बाहेर अनेक कटकटी असतलीच, पण त्या चपलेसारख्या बाहेर ठेवून घरात हसत यायचे. कठोर, शिस्तप्रिय पण तितकेच प्रेमळ व कुटुंबात रमणारे होते. धैर्य, साहस या गुणांमुळे थोडे आक्रमकही होते. आपल्या

Marathe Pratishthan

तत्त्वांशी ठाम होते. त्यामुळे दोन-तीन मंत्र्यांशी चांगले वैयक्तिक संबंध असूनही त्याचा व्यक्तिगत कामासाठी कधीही वापर केला नाही. खाण्याची व दुसऱ्याला उत्तम खाऊ घालण्याची आवड होती. संगीत व प्रवास यांची आवड होती. योग्य वेळेला दुसऱ्याला मदतीचा हात देणेहेच त्यांचे व्यसन होते. त्यासाठी झालेले लाखो रुपयांचे नुकसान त्यांनी सोसले आहे. दुसऱ्याकडून फारशी अपेक्षा करत नसत. आईचाही तितकाच आदर करत तिच्या सहकार्याचा आवर्जून उत्लेख करत. बाबांचे प्रेम तर आम्हाला मिळालेच पण त्यांची शिस्त, शिकवण, संस्कार हेही मनावर ठसले आहे. स्वावलंबन, शिस्त हा त्यांचा बाणा होता. त्याचा लहानपणी रागही यायचा पण आज आम्ही सर्वजण आमच्या व्यवसायात त्याची फळे चाखतो आहोत. नातेवाईकांना आवर्जून भेटत असत. आईबाबांनी नात्यातला एकही लग्नसमारंभ चुकवला नाही.

आम्ही तीन बहिणी व एक भाऊ आहोत. भाऊ इंजिनिअर असून (हुबळीला व्यवसाय आहे. त्यानेही बाबांच्या अनेक गोष्टी आत्मसात केल्या आहेत.

असे आमचे प्रिय बाबा अगदी अल्पशा आजाराने २९-१०-२००९. कार्तिकी एकादशी या दिवशी आम्हाला सोडून गेले. आम्हा सर्वांच्याच आयुष्यात भरून न येणारी पोकळी निर्माण करून बाबा गेल्यामुळे आमच्या जीवनाचा सूरच हरवला आहे.

**- श्रीमती आशा सोवनी (पृ.२८५)**
सी-१-७. शिवविलास,
शिवाजी हौसिंग सोसायटीच्या जवळ,
बहिरटवाडी, सेनापती बापट रोड, पुणे ४११ ०१६
फोन : ०२०-२५६३२३३३

## 'हितगुज'साठी जाहिराती द्याव्यात

अभिनंदन, अभिष्टचिंतन, पुण्यतिथी, पुण्यस्मरण, साठावा वाढदिवस, अमृतमहोत्सव, सहस्त्रचंद्रदर्शन या निमित्ताने किंवा आपल्या उद्योगव्यवसायाच्या जाहिराती देऊन 'हितगुज'ला सहकार्य करावे.

पाव पान रु. ६००/-
अर्धे पान रु. १,२००/-
पूर्ण पान रु. २,५००/-

रक्कम 'मराठे प्रतिष्ठान' नावाने मुंबईतल्या पत्त्यावर चेकने पाठवावी.

## वाचकांचा पत्रव्यवहार

'हितगुज'च्या संदर्भात मी काही सूचना करून इच्छितो. त्याचा विचार जरून करावा. हे नियतकालिक मराठे प्रतिष्ठानचे मुखपत्र आहेच; परंतु सभासदांशी संपर्क साधण्याचे ते एक प्रमुख साधन आहे. त्यामुळेच त्याचे प्रकाशन व वितरण कुठलीही अडचण न येता सातत्याने व वेळेवर होणे अनिवार्य आहे. ही झाली जनसंपर्काची बाजू. परंतु या उपक्रमाला आर्थिक बाजूही आहे आणि ती तेवढीच महत्त्वाची आहे. किंबहुना 'हितगुज'चे अस्तित्वच या महत्त्वाच्या घटकाशी निगडित आहे याचाही विसर पडता कामा नये. लेखक या नात्याने माझा अनेक प्रकाशकांशी संबंध आला आहे. व त्यांच्याशी वेळोवेळी बोलताना यासंबंधी अनेक बाबी लक्षात आल्या. अर्थात कुठलीही प्रकाशन संस्था अथवा नियतकालिक म्हणजे केवळ 'व्यवसाय' असतो. 'हितगुज' हे व्यावसायिक पातळीवर चालविले जात नाही. परंतु त्यासाठी किमान आर्थिक पाठबळ उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

काही वर्षांपूर्वी मी एक सूचना केली होती 'हितगुज' ची आजीव वर्गणी ही तूर्तास दुप्पट करावी व त्या पत्रासोबत एक धनादेशही पाठविला होता. त्यावेळी ते पत्र 'हितगुज' मध्ये प्रसिद्ध केले होते व त्या आवाहनाला थोडाफार प्रतिसाद मिळाला असे ऐकले. आता तर भाववाढ ही प्रचंड प्रमाणात झाली आहे. त्या दृष्टीने 'हितगुज'साठी एक कायमस्वरूपी निधी निर्माण करावा अशी माझी सूचना आहे. त्यासाठी किमान पन्नास सदस्यांनी 'मराठे प्रतिष्ठान' कडे रु.१०,०००/- तीन वर्षांसाठी बिनव्याजी ठेव म्हणून द्यावी. एकूण रक्कम रु. ५,००,०००/- जमेल. द.सा.द.शे ८%दराने वार्षिक व्याज रु. ४०,००० मिळेल. म्हणजेच तीन वर्षात 'हितगुज'साठी रु.१,२०,०००/- चे आर्थिक पाठबळ निर्माण होतील. तीन वर्षांनंतर ठेवीदारांची रक्कम (प्रत्येकी रु. १०,०००) सभासदांना परत करावी. तुम्ही ४९ सभासद शोधायचे आहेत कारण मी स्वतः एक असेन. जरूर विचार करा. फोनवर संपर्क साधल्यास विस्ताराने बोलता येईल

**-श्री. ना. ज. जाईल (पृ.७५५)**
१२, साधनासदन, नौपाडा हायवे सोसायटी, एस. व्ही. रोड, नौपाडा
ठाणे (प.) ४०० ६०२ फोन -०२२-२५४०६७१७

**कलेतून माणूस साधनाच नाही, तर स्वतःचा शोध घेत असतो**

**- रविंद्रनाथ टागोर**



Marathe Pratishthan

# ज्ञानभाषा मराठी

मराठी (भारतीय भाषा) ज्ञानभाषा होईल ज्यावेळी पूर्वप्राथमिकपासून विद्यापीठ शिक्षण मराठी माध्यमातून होईल. तसेच ग्रामपंचायत ते राज्यसरकारपर्यंतचा पत्रव्यवहार व राज्यकारभार मराठीतून होईल. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर हे सर्व होईल असे वाटले होते. परंतु स्वातंत्र्याला आता चौसष्ट वर्षे होताहेत आणि साऱ्या देशात पूर्वप्राथमिकपासून इंग्रजी माध्यम स्वीकारण्याबाबत चढाओढ आहे.

याबाबतीत अनेक विचारवंतांनी १९४७ पासून लिहिले आहे. परंतु लोककल्याणकारी - आम आदमीचे सरकार आणि महत्त्वाकांक्षी पालक यांनी इंग्रजी ज्ञानभाषा स्वीकारून प्रसिद्ध इंग्रज लेखक व समीक्षक माल्कम मॅगरिजचे उद्गार, पृथ्वीच्या पाठीवर शेवटचा इंग्रज भारतीय असेल हे सिद्ध केले आहे.

मूल शिकते कसे? यासंबंधी मेंदू संशोधन व बहुविध बुद्धिमत्तेचा सिद्धांत काय मांडते आहे याचा विचार पालक करत नाहीत. मेंदूविरोधी शिक्षण, स्पर्धा हे विष आहे असे म्हणणाऱ्या ताराबाई मोडक यांचा विचार न मानता एकेका गुणासाठी स्पर्धा, पाठ्यपुस्तके, लेखी परीक्षा यावरच भर देणारी शिक्षणपद्धती स्वातंत्र्यानंतर आचार्य विनोबा भावे यांनी सांगूनही सरकारने बदलली नाही. त्यामुळेच भारतीय भाषा ज्ञानभाषा होऊ शकत नाही. मॅक्सिन बर्नसन सारखी अमेरिकन विदुषी मराठी माध्यमाच्या शाळांतून इंग्रजी सुधारा, इंग्रजी माध्यम नको असे म्हणते, ते आपण लक्षात घेत नाही.

इयत्ता दहावीपर्यंत भारतीय भाषांतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाच सरकारी-खाजगी क्षेत्रात नोकरी मिळेल, स्पर्धापरीक्षांना बसण्याची परवनागी मिळेल असा कायदा सरकारने करावा असे मी श्रीमती बर्नस्नच्या लेखावर १९७८ साली सुचविले होते, जे आजही मांडतो.

परंतु मराठी ज्ञानभाषा करण्यासाठी व्यवहारात तिचा उपयोग केला पाहिजे.

अजूनही आपण आपल्या भाषेतून स्वाक्षरी करत नाही. स्वाक्षरीचा पुरावा गोळा केला तर साऱ्या देशाची भाषा इंग्रजी ठरते.

त्यामुळे देशातील सर्व नागरिक आपापल्या मातृभाषेतून स्वाक्षरी करतील अगदी इंग्रजी पत्रावरसुद्धा स्वाक्षरी आपल्या भाषेतून करतील.

पूर्वप्राथमिकपासून आपल्या पालकांना मराठी माध्यमातून शिक्षण देतील, कारण स्वभाषेवर प्रभुत्व मिळविल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही भाषेवर प्रभुत्व मिळविता येत नाही, हा सार्वत्रिक अनुभव आहे. त्यामुळे स्वभाषेवर प्रभुत्व मिळविण्यासाठी जे उपाय श्रीमती वर्षा सहस्त्रबुद्धे, श्री. राजीव तांबे, प्रा. रमेश पानसे सारख्या तज्ज्ञांनी केल्या आहेत त्यांचाही विचार करावा लागेल.

शेवटी प्रत्यक्ष व्यवहारात प्रत्येक मराठी व्यक्तीने पुढे सांगितल्याप्रमाणे केल्यास मराठी ज्ञानभाषा होईल असे मला वाटते.

१. स्वतःच्या भाषेत स्वाक्षरी सर्व ठिकाणी करून

२. पत्रलेखन, अर्ज, बँकातील-संस्थातली व्यवहार स्वभाषेत करून

३. भेटपत्र - कागदपत्र मराठीत छापून

४. घराच्या नावाची, व्यवसायाची, आपल्या नावाची पाटी स्वभाषत असतील

५. दुसऱ्याशी संभाषण करताना स्वभाषेचा वापर

६. आपल्या भाषेतील वृत्तपत्र-मासिक-पुस्तक विकत घेऊन

७. ग्रामपंचायत/सहकारी संस्था/ शासनाकडे स्वभाषेत पत्रव्यवहार करून व त्याच भाषेत उत्तर मिळण्याचा आग्रह धरून

८. आपल्या पाल्याला मराठी माध्यमाच्या शाळेत शिक्षण देऊन, इंग्रजीच कशाला जपानी, चिनी, रशियन भाषा पण उत्तम येतील याचा आग्रह धरून.

९. घरातील कोणत्याही कार्यक्रमाच्या पत्रिका स्वभाषेत छापून

१०. आकाशवाणी-दूरचित्रवाणीवरील स्वभाषेतील कार्यक्रम ऐकण्याचे-बघण्याचे ठरवून.

११. इतर भाषांतील चांगले साहित्य स्वभाषेत अनुवाद करून व स्वभाषेतील चांगले साहित्य इतर आपल्याला येत असलेल्या भाषेत अनुवादित करून.

१२. इंग्रजी माध्यमाच्या शाळात जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी इयत्ता पहिलीपासून मराठी उत्तम तऱ्हेने शिकवली जावी याचा आग्रह धरून

१३. इंग्रजी माध्यमाच्या शाळात इतिहास-भूगोल, नागरिकशास्त्र, पर्यावरण-शिक्षण, शारीरिक शिक्षण, योगशिक्षण, कला, संगीत, व्यावसायिक शिक्षण हे मराठी भाषेतून द्यावे याचा आग्रह धरून

थोडक्यात न्यूनगंड सोडून मराठीची कास सर्व व्यवहारात सर्वत्र धरली तर एकाच वर्षात मराठी खऱ्या अर्थाने ज्ञानभाषा होईल याबद्दल मला तिळमात्र शंका नाही.

**- श्री. कालिदास मराठे (पृ.५४१)**

श्री-२१०, ढवळी, पो. कवळी, ता. फोंडा, गोवा ४०३४०१ फोन : ०८३२-२३१३८०५ मोबाईल : ९४२३८८२२९०



Marathe Pratishthan

# नंदू आणि सिगारेट

**श्री. अ. द. मराठे**

ही घटना १९६९च्या एप्रिल किंवा मे मधील आहे. मी बी.एड.ची परीक्षा देऊन कोल्हापूरहून माझ्या गावी आलो होतो. शिक्षण आणि कोल्हापूरचे वास्तव्य थोडे दरमहा मिळणाऱ्या स्टायपेंडवर, थोडे तुटपुंज्या बचतीवर, थोडे एका भावाने केलेल्या मदतीवर असे पार पाडले होते. घरी आलो तेव्हा जवळ दहा-बारा रुपये होते. शेजारचा मधू लेले पण माझ्याबरोबर कोल्हापूरला होता. त्याने कॉलेज शिक्षण अर्धवट सोडले होते. तो सहकारी क्षेत्रातील काहीतरी डिप्लोमा घेत होता. खरे तर आम्हा दोघांना काहीच कमी नव्हते. घरात दोन वेळचे जेवण, मधल्या वेळचे खाणे, दोन वेळचा चहा, सर्व काही यशास्थित मिळत होते, पण आम्हाला दिवसाला दोन-तीन तरी सिगरेटी लागायच्या.

आमच्या घरापासून थोड्या अंतरावर लक्ष्मीनारायणचे देऊळ आहे. आमचा गाव डोंगर उतारावर असल्याने घरे उंच सखल जागांवर आहे. चढउतार सारखे करावे लागतात. देऊळ उंचावर आहे. त्याच्या पायथ्याला एक लहान तळी आहे. तळीच्या बाजूला वडाचे झाड आहे. दुपारचे जेवण झाले की कआम्ही घरातून सटकून वडाच्या झाडाखाली तळीवर जाऊन बसायचे. यावेळी इथे पूर्ण एकांत असे. मग आम्ही एक एक सिगारेट ओढायचे आणि थोड्या वेळाने वामकुक्षीला घरी यायचे. संध्याकाळी गावाबाहेर दूर कुठेतरी फिरायचा जायचे. तिथे एक एक सिगारेट ओढायचे. घरी आल्यावर रात्री जेवलो की पुन्हा तळीवर वडाखाली सिगारेट ओढायची आणि घरी यायचे.

घरापासून तळीवर जाताना वाटते एक टप्पा होता. तो म्हणजे माझ्या मामांचे घर, मामांच्या घराचा उल्लेख आम्ही छापखाना असा करतो. माझे आजोबा गो. ना. दातार हे मागच्या पिढीचे कादंबरीकार. त्यांच्या कादंबऱ्या छापण्यास प्रकाशक टाळाटाळ करायला लागले तेव्हा त्यांनी स्वत:चा छापखाना सुरू केला. आजही तो तिथे आहे. हा छापखाना घराच्या भव्य पडवीत आहे. आम्ही दुपारी जायचे तेव्हा घरात मामांचे जेवण सुरू असायचे. छापखान्यात चुन्याची डबी आणि तंबाखूचा डबा ठेवलेला असायचा. त्याचा उपयोग मुक्तद्वार होता. छापखान्यात आमचे दिवसातून दोनदा तरी जाणे येणे असे.

मधूच्या मोठ्या घरात तीनच माणसे होती. त्यामुळे सिगरेटचे पाकीट आणि काडेपेटी त्याच्या घरात असे. पाकीट आम्ही आळीपाळीने विकत घ्यायचे. संध्याकाळी फिरायला जातान आम्ही एकेकदा करंदीकरांची मिसळ, नवऱ्यांकडचे बटाटेवडे आणि कोल्हारामभाऊची भजी खाल्ली होती. त्यात एकूण एक रुपया तरी खलास झाला होता. एकूण आमची पुंजी कमी होत होती. जूनच्या दहा तारखेपर्यंत तरी सिगारेटींना पैसे पुरायला हवे होते. मग आम्ही रात्रीची सिगारेट सोडून दिली. तरीही पैसे कमी कमी होतच होते. मग पिवळा हत्ती, चार मिनार अशा स्वस्त सिगारेटींवर आलो. अखेर पैसे संपलेच. मधू अगदीच कफल्लक झाला. मला दहा जूननंतर मुंबईला यायचे होते. तेव्हा खिशात एक दोन रुपये तरी ठेवणे आवश्यक होते. मी ते मोठ्या बंदोबस्ताने ठेवून दिले आणि कफल्लक झाल्याचे जाहीर केले. आधी आमचे पैसे संपले आणि नंतर सिगारेटी संपल्या. एका दुपारी एकच चारमिनार दोघात ओढली आणि पाकिटाचे तळीत विसर्जन केले. ''आता सिगारेट बंद'' मधू म्हणाला. पण दुसऱ्या दिवशी जेवणानंतर दोघांनाही तलफ आली. मोठी पंचाईत झाली.

खरे तर मधूचे वडील दररोज एक पाकीट सिगारेटी ओढायचे. घरात कायम स्टॉक असायचा. माझे वडील विड्या ओढायचे. घरात विड्या असायचा. माझे वडील विड्या ओढायचे. घरात विड्या असायच्या. पण आमची दोघांचीही त्या चोरायची हिंमत नव्हती. मी माझ्या भावाकडे चार-पाच रुपये मागितले असते तर नक्की मिळाले असते. पण ते मागायची मला अतिशय लाज वाटायची. गावात आमची घरे प्रतिष्ठित होती. त्यामुळे 'माल' उधारीवर आणता येईना. माझ्याजवळ डोंबिवलीतल्या एका शाळेचे नेमणूकपत्र होते. नोकरीची शाश्वती होती. पण पगार जुलै महिन्यात मिळणार होता. मी मुंबईत जाणार हे माहिती असलेला दुकानदार मला उधारी देण्याची शक्यताच नव्हती. मधूला पण गावच्या बँकेत नोकरी मिळणार होती. पण कधी ते कोणालाच माहिती नव्हत. सर्वच बाजूंनी आम्ही अडचणीत आलो. मी सुचविले, आपण बाळंतिणीसारख्या ओव्याच्या विड्या ओढू या. घरातून ओवा नेला आणि वर्तमानपत्राच्या कागदाच्या सुरळीत घालून विड्या करून ओढल्या. त्याने समाधान तर नाहीच झाले, पण घसा खवखवयाला लागला. गावत कुड्याच्या झाडांवर पानेच शिल्लक नव्हती. होती ती कोवळी होती. आणि हिरव्या पानाची विडी पेटणार कशी? हा प्रश्न आलाच.

दुसऱ्या दिवशी छापखान्यात गेलो. मामा जेवत असताना मी त्यांच्याशी बोलत होतो. मधू गुपचूप बाहेर गेला आणि चलाखीने थोडा तंबाखू पुडीत घेऊन परत आला. आम्ही वडावर गेलो. मी वडाचे एक फार न वाळलेले पिवळे पान शोधून, त्यात तंबाखू घालून चिरुटासारखी मोठी सिगारेट वळली. काड्या वारंवार पेटवाव्या लागत होत्या, पण प्रयोग यशस्वी झाला होता. मामांनी तंबाखूत थोडा सुगंधी तंबाखू मिसळला होता. त्याचा आणि वडाच्या पानाचा स्वाद मिळून खमंग विडी झाली होती. दोघांचीही तलफ भागून अर्धी विडी उरली. ती एका दगडाखाली सुरक्षित ठेवून दुसऱ्या दिवशी ओढली. तिसऱ्या दिवशी छापखान्यात जायला आम्हाला उशीर झाला. तंबाखू पळविण्याची चलाखी जमेना. कारण मामा स्वत:च डबा पुढ्यात घेऊन बसले होते.

वडावर गेल्यावर मधू म्हणाला, ''गावात कोणी मरत पण नाही.'' गावात अशी पद्धत होती की मयताच्या तयारी विड्यांच्या दोन बंडलांचा समावेश असे. सरण पेटल्यावर सर्वजण वयोभेद



Marathe Pratishthan

विसरून विड्या ओढत. पण हे प्रसंग वर्षातून एकदा दोनदाच आले तर! आणि मयत स्वजातीय असेल तर जायचे. इतर जातीत विड्यांऐवजी दारू असायची असे म्हणत. आम्ही दोन दिवस वडावर नुसतेच जाऊन आलो. तिसऱ्या दिवशी आम्ही घरी येऊन झोपलो. माझा डोळा लागतो न लागतो तोच आनंदाने ओरडत माझ्या घरी आला आणि म्हणाला, ''सुभ्या, चान्स आहे. नंदू अत्यस्वस्थ आहे.''

नंदू हा माझा वर्गमित्र. तो एका वर्षी नापास होऊन मागे पडला होता. एकेकाळी नंदूचे घराणे सुस्थितीत होते. मात्र पुढे धंद्यांत खोट येऊन त्याची वाईट अवस्था झाली. नंदूचा मोठा भाऊ मॅट्रिक होऊन अर्बन बँकेत नोकरीला लागला, तोवर त्याचे आईवडील गेले होते. त्याच्यावर लहान भावंडांचा भार होता. आबाळ म्हणा की कुपोषण म्हणा ही भावंडे घराण्याला शाप लागल्यासारखी एकामागून एक क्षय लागून मरत होती. नंदूही आता त्याच मार्गावर होता. त्याच्यावर उपचार करणारे डॉ.आमचे शेजारी. त्यांच्या बोलण्यात नंदू अत्यावस्थ असल्याचे मधूला कळले होते. आम्ही जाता-येता दादा ना नंदूची हालहवाल विचारीत होतो. ''फार तर दोन दिवस जातील.'' दादा म्हणाले. पण असा आठवडा उलटला तरी दादांचे उत्तर तेच होते. आम्ही उतावीळ झाल्यासारखे केव्हा बोलावणे येते याची वाट बघत होतो. रात्री बोलावणे येण्यात अर्थ नव्हता. कारण रात्री आठला सगळा बाजार बंद होत असे. मग फक्त लाकडांचीच सोय शक्य होती. सिगरेट मिळणे शक्य नव्हते.

पण नंदू मित्रकार्य करून गेला.

भर दुपारी दीड वाजता आम्हाला बोलावणे आले. मधू उत्साहाने तयारीला लागला. त्याने दोन पाकिटे विकत घेतली. एक खिशात टाकले. एक तयारीत घेतले. नंदूचे स्मशान कार्य पार पडले. आमची आठवड्याची सोय झाली

मधू आणि मी आमचे दोघांचेही सिगारेट ओढणे इतिहासजमा कधी झाले ते आम्हालाही आठवत नाही. मात्र ते दिवस आठवले की कधी लाज वाटते, कधी खंत वाटते, कधी आपण असे का वागलो हे कोडे पडते. आम्ही नंदूच्या समाचाराला न जाता त्याच्या मयताची वाट बघत कसे बसलो? आम्ही दोघेही निर्ढावलेले नव्हतो. व्यसन तर तसे आटोक्यात होते. मात्र आम्हाला भविष्याचर चिंता नसली तरी वर्तमानाची फार लाज वाटत होती. अल्पकालीन असली तरीसुद्धा बेकारी आम्हाला आतून अस्वस्थ करीत होती. तिच्यावर मात करायला आम्ही असे केले का? मयत कार्याची मधूला मोठी हौस. अनेकदा त्याचा उत्साह आवरावा लागे. त्या हौसेतून तो असे वागला आणि मी त्याला साथ का? काहीच कळत नाही. एक मात्र नक्की की आमच्या दोघांच्याही जीवनात हा प्रसंग एकदाच घडला.

**- श्री. अ. द. मराठे**
१० शांतिनाथ अपार्टमेंट, १६८ यशवंत नगर,
तळेगाव दाभाडे, जि. पुणे ४१०५०७

## सहवेदना

श्री. अरविंद महादेव चक्रदेव (पृ.७३२) हे त्यांचे पत्नीसह नेपाळच्या सहलीला गेले असताना परतीच्या प्रवासात त्यांना 'खाटमांडू' येथे बस प्रवासामध्ये अचानक ह्रदयविकाराचा तीव्र झटका येऊन त्यातच त्याचे दु:खद निधन झाले

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. श्री. अरविंद महादेव चक्रदेव यांना विनम्र श्रद्धांजली. मराठे प्रतिष्ठान कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे. ते ६६ वर्षांचे होते.

त्यांच्या मागे वृद्ध मातोश्री, पत्नी, सूनबाई व नातू आहेत. श्रीमत भगवतगीतेचे संपूर्ण १८अध्याय त्यांचे अर्थासह पाठ होते. (भूतपूर्व तुरुंगाधिकारी व 'हितगुज'चे लेखक श्री. अच्युत महादेव चक्रदेव यांचे ते धाकटे बंधू होते.)

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. श्री. अरविंद महादेव चक्रदेव यांना भावपूर्ण श्रद्धांजली. मराठे प्रतिष्ठान कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

## सहवेदना

आडेली येथील रहिवासी श्रीमती सुनिती चिंतामण मराठे (वय ८०) यांचे वृद्धापकाळाने १८ नोव्हेंबर २०११ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुलगे, चार मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कै. श्रीमती सुनिती चिंतामण मराठे यांना विनम्र श्रद्धांजली. मराठे प्रतिष्ठान कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

## गोमंतक मराठे परिवार संमेलन २०१२

रविवार दिनांक १९-२-२०१२ ला सकाळी ९ ते दुपारी ४.४५ वाजता श्री. वसंत विष्णू मराठे यांच्या निवासस्थानी चिरेऱ्हाळ, होंडा, पोस्ट प्रतापनगर, साखळी, गोवा येथे दिमाखदारपणे संपन्न झाले.

**जीवनातील काही पराभव हे विजयाहून अधिक श्रेष्ठ असतात.**



Marathe Pratishthan

# गोकर्ण प्रतिष्ठानचा मंदिर प्रकल्प व 'घरकुल' वृद्धाश्रम

**श्रीदेवी अंबेजोगाई व श्रीदेव व्याडेश्वर यांची भव्य मंदिरे (कोंढाणे, (ता. कर्जत) पो. कोंदिवडे, जि. रायगड ४१०२०१)**

कर्जत-कोंढाणे येथील गोगटे कुटुंबीयांनी, कोंढाणे गावी श्रीदेवी अंबाजोगाई व श्रीदेव व्याडेश्वर यांचा एकत्रित मंदिर प्रकल्प साकार करण्याचा संकल्प केला आहे. कोंढाणे गाव मध्य रेल्वेच्या मुंबई-पुणे मार्गावरील कर्जत स्थानकापासून दहा कि.मी. अंतरावर आहे. या प्रकल्पाविषयी थोडक्यात माहिती अशी :

दोन स्वतंत्र मंदिरात श्रीदेवी अंबाजोगाई व श्रीदेव व्याडेश्वर यांच्या प्रतिकृतींची पूर्ण धार्मिक पद्धतीने प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. मंदिरासमोर एक भव्य सभामंडप उभा केला जाईल.

मंदिरात दररोज नित्यनेमाने पूजा व आरती केली जाईल. नियमितपणे भजन, कीर्तन, प्रवचन इत्यादीचे आयोजन करण्यात येईल. याशिवाय काही वार्षिकोत्सवही साजरे केली जातील. येथे येऊन आपण आपले कुलधर्म, कुलाचार अर्थात बोडण, गोंधळ, लघुरुद्र, महालक्ष्मी, सत्यनारायण पूजा यथासांग पार पाडू शकाल. याकरिता आम्ही आपली पूजा साहित्य, प्रसाद, भोजन व निवास याची सोय करणार आहोत. आपली इच्छा असल्यास मंदिराचे उपाध्याय या कार्याचे पौरोहित्य करतील. आध्यात्मिक साधना करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी एक ज्ञानमंदिरही येथे असेल. होमकुंडही बांधले जाणार असून आपण येथे शतचंडी, नवचंडी इत्यादीचे आयोजन करू शकाल.

मंदिराचे जवळच भक्तनिवास बांधण्यात येणार आहे, ज्यात वृद्धांसाठीचे एक नाविन्यपूर्ण 'घरकुल' असेल. भक्तनिवासाजवळच एक सुंदर पुष्पवाटिका साकारली जाणार आहे.

हा प्रकल्प उल्हास नदी किनारी उभा राहणार असून शेजारीच गोगटे कुटुंबाची गौशाळा आहे. तेथील पन्नास-साठ गोमातांचे अस्तित्व या प्रकल्पाचे मांगल्य अधिक तेजोमय करील हे खरेच. चारी दिशांना हिरवेगार डोंगर, अमाप वनश्री, आसमंतातील नीरव शांतता यामुळे निसर्गरम्य वातावरणातील हा प्रकल्प आपल्या सर्वांच्या श्रद्धेचे माहेरघर होईल. डोंगरातील पांडवकालीन लेणी व गुंफा, दक्षिणेकडील राजमाची किल्ला व पैलतीरी असलेली गंभीरनाथांची समाधी या पौराणिक, ऐतिहासिक व सामाजिक बांधिलकीची साक्ष देणाऱ्या वास्तूमुळे हा परिसर एक पावनभूमी झाली आहे.

असा हा प्रकल्प संपूर्ण महाराष्ट्रातील पहिलाच असेल. समस्त चित्पावन कुटुंबीय व परिवाराचे अपेक्षित सहकार्य. अधिक माहितीसाठी संपर्क साधू शकता.

**१. श्री. दिगंबर शिवराम गोगटे,** सी-३, हिमालय, स्टेट बँक स्टाफ सोसायटी, ११५, शिवतीर्थ नगर, पौड रोड, पुणे ४११ ०३८. मोबाईल - ९८२३९३२०५४

**२. श्री. अनिल दत्तात्रेय गोगटे,** वनविहार हॉटेल, मु. कोंढाणे, ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१, मोबाईल - ९२७१६१८१८४

तेव्हा मराठे परिवाराती सदस्यांनी सहल काढून किंवा व्यक्तिगत कोंढाणे या तीर्थस्थळी जाऊन श्रीदेवी अंबाजोगाई व श्रीदेव व्याडेश्वर यांचे दर्शन घ्यावे.

## सुशांत मराठेचे शतक

क्रिकेटवीर सुशांत हेमंत मराठे याने रणजी एलिट 'अ' गट लढतीत मुंबई संघ उत्तर प्रदेशाविरुद्ध पहिल्या दिवशी तीन बाद दोनशे तीन अशी मजल मारली. शतकवीर सुशांत मराठेने कौस्तुभ पवारच्या साथीने १८९ धावांची सलामी दिली पण शेवटच्या अर्ध्या तासात मुंबईने मराठे, पवार, अभिषेक नायर हे तीन मोहेरे गमावले.

अखिलेश दास स्टेडियमवरील लढतीत नाणेफेक जिंकून वसीम जाफरने प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. धुक्यामुळे खेळ दोन तास उशीराने सुरू झाला. यष्टीरक्षक फलंदाज सुशांत मराठेने झटपट शतक झळकावले ते १५ चौकारांनिशी १६३ चेंडून १०२ धावा तडकावणाऱ्या सुशांतने कौस्तुभ पवारच्या साथीने ५५.४ षटकात १८९ धावांची खणखणीत सलामी मुंबईला करून दिली. भुवनेश कुमारने सुशांतला झेलबाद केले. रणजी सामन्यातील सुशांतचे हे दुसरे शतक आहे.

क्रिकेटवीर सुशांत मराठे याचे मराठे प्रतिष्ठानद्वारा हार्दिक अभिनंदन!

**टीकाकार बोहारणीसारखे असतात कितीही चांगला शालू जरी दिला तरी ती म्हणतेच ह्यापेक्षा काहीतरी चांगलं काढा.**



Marathe Pratishthan

## मराठे परिवार व्यक्तिचित्रण स्पर्धा २०१२ मध्यम व मोठ्या गटाकरिता

मी २५-१२-२०११ ला मराठे प्रतिष्ठानचे जे पुण्यात संमेलन झाले त्यावेळी वरील स्पर्धेची घोषणा केली होती. स्पर्धेचे नियम पुढीलप्रमाणे आहेत. स्पर्धा दोन गटात होईल.

१. मध्यम गट वय वर्षे १० ते ४९
मोठा गट वय वर्षे ५०चे पुढील

२. स्पर्धकाने आपली व्यक्तिचित्रणे काळ्या शाईने लिहावीत.

३. आपली जन्मतारीख स्पर्धेत लिहावीत तसेच आपल्या गटाचा उल्लेख करावा तसेच आपला संपूर्ण पत्ता व फोन नंबर कळवावेत.

४. स्पर्धकांनी आपल्या परिवारातील विशेष प्रावीण्य मिळविलेल्या तीन आजी व माजी व्यक्तिंची व्यक्तिचित्रणे १० ओळीत करावीत. सध्या जे विशेष प्रावीण्य मिळवित आहे. त्यांच्या व्यवसायाचा उल्लेख तसेच विशेष प्रावीण्य कोणत्या क्षेत्रात केला याचा उल्लेख करावा तसेच त्यांचा संपूर्ण पत्ता व फोन नंबर आवश्यक कळवावा.

५. स्पर्धेचे नाव 'माझा परिवार' असे आहे.

६. वरील स्पर्धेत माझ्या परिवारातील कोणीही भाग घेऊ शकत नाही.

७. स्पर्धेची बक्षिसे दोन गटात पुढील प्रमाणात आहे पहिले बक्षीस ५००, ३०० व २०० ची आहेत.

८. वरील स्पर्धा माझे वडील व काका अनुक्रमे चिंतामण व सुधाकर यांच्या स्मरणार्थ ठेवलेली आहे कारण आजच दोघांचा जन्मदिन व स्मृतीदिन आहे.

९. स्पर्धकानी आपली व्यक्तिचित्रणे माझ्या पत्त्यावर ३१-७-२०१२ पूर्वी पाठवावी.

१०. स्पर्धेचा निकाल सप्टेंबर १२ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

११. स्पर्धकांची बक्षिसे १५-१०-२०१२ पूर्वी आपल्या पत्त्यावर चेकद्वारे पाठवली जातील.

**: निबंध पाठविण्याचा पत्ता :**

'सार्थक', प्लॉट नं. ३४अ, नवी पेठ, पुणे ४११०३०. फोन : ०२०-२४५३१६५१

**श्री. गजानन चिंतामण मराठे (पृ.१२९)**
'सार्थक', प्लॉट नं. ३४अ, नवी पेठ,
पुणे ४११०३० फोन : ०२०-२४५३१६५१

## शरयू जाखोटियाचे एम.बी.ए.साठी अमेरिकेला प्रयाण



कु. शरयू जाखोटिया, डॉ. गिरीश जाखोटिया व सौ. मंजिरी मराठे (पृ.१२८) जाखोटिया यांची सुकन्या आणि कै. दत्तात्रय काशिनाथ मराठे व श्री. माधुरी द. मराठे यांची नात, युनिर्व्हसिटी ऑफ मायामी, अमेरिका येथे दोन वर्षांच्या एम.बी.ए. या कोर्ससाठी ९ ऑगस्ट २०११रोजी रवाना झाली. तिची न्यूयॉर्कमध्ये ऑक्टोबर २०११ मध्ये झालेल्या 'कॉर्पोरेट इव्हेंट'साठी निवड झाली व तिने तिथे उत्तम प्रेझेंटेशन केले.

शरयू ऑगस्ट २०११ मध्ये बायोमेडिकल इंजिनिअरिंग डिस्टिंक्शनमध्ये उत्तीर्ण झाली.

मराठे प्रतिष्ठानद्वारा कुमारी शरयूचे हार्दिक अभिनंदन आणि शुभेच्छा

**एकादशी दुप्पट खाशी - तिसऱ्या दिवशी वैद्याकडे धावशी**

Marathe Pratishthan

# बाप - घराचे अस्तित्व

**प्रेषक : मधुरा मराठे**

"आई घराचं मांगल्या असते तर बाप घराचं अस्तित्व असतो.'' पण घरच्या या अस्तित्वाला खरंच कधी आम्ही समजून घेतलं आहे का? वडिलांना महत्त्व असूनही त्यांच्याविषयी जास्त बोललं जात नाही, लिहिलं जात नाही. कोणताही व्याख्याता आईविषयी जास्त वेळ बोलत राहतो. संत महात्म्यांनी आईचंच महत्त्व अधिक सांगितलेलं आहे. देवादिकांनी आईचेत तोंड भरून कौतुक केले आहे. चांगल्या गोष्टींना आईचीच उपमा दिली जाते. पण बापाविषयी कुठेच फारसं बोललं जात नाही. काही लोकांनी बाप रेखाटला पण तोही तापट, व्यसनी, मारझोड करणारा. समाजात एक-दोन टक्के बाप असे असतीलही, पण चांगल्या वडिलांबद्दल काय?

आईकडे अश्रूंचे पाट असतात, पण बापाकडे संगमाचे घाट असतात. आई रडून मोकळी होते, पण सांत्वन वडिलांनाच करावं लागतं आणि रडणाऱ्यांपेक्षा सांत्वन करणाऱ्यांवरच जास्त ताण पडतो, कारण ज्योतीपेक्षा समईच जास्त तापते ना! पण श्रेय नेहमी ज्योतीलाच मिळत राहतं. रोजच्या जेवणाची सोय करणारी आई आमच्या लक्षात राहते, पण आयुष्याच्या शिदोरीची सोय करणारा बाप आम्ही किती सहज विसरून जातो. आई रडते, वडिलांना रडता येत नाही. स्वत:चा बाप वारला तरी रडता येत नाही, कारण छोट्या भावंडांना जपायचं असतं. आई गेली तरीही रडता येत नाही, कारण बहिणींचा आधार व्हायचं असतं. पत्नी अर्ध्यावरच साथ सोडून गेली तर पोरांसाठी अश्रूंना आवर घालावा लागतो.

जिजाबाईंनी शिवाजी घडवला असं अवश्य म्हणावं, पण त्याच वेळेस शहाजीराजांची ओढाताणसुद्धा लक्षात घ्यावी. देवकीचं, यशोदेचं कौतुक अवश्य करावं, पण पुरातून पोराला डोक्यावर घेऊन जाणारा वासुदेव लक्षात ठेवावा, राम हा कौशल्येचा पुत्र अवश्य असेल पण वियोगात तडफडून मरण पावला तो पिता दशरथ होता. वडिलांच्या टाचा झिजलेल्या चपलांकडे पाहिलं की त्यांचं प्रेम कळतं. त्याची फाटकी बनियान पाहिली की कळतं, "आमच्या नशिबाची भोकं त्यांच्या बनियनला पडली आहेत.'' त्यांची दाढी वाढलेला चेहरा त्यांची काटकसर दाखवतो.

मुलीला चुडीदार घेतील, मुलाला लुंगी घेतील पण स्वत: मात्र जुनी पँट वापरायला काढतील. मुलगा सलूनमध्ये वीस-पंचवीस रुपये खर्च करतो. मुलगी ब्युटी पार्लरमध्ये तीसेक रुपये खर्च करते पण त्याच घरातला बाप दाढीचा साबण संपला म्हणून अंघोळीच्या साबणाने दाढी खरडत असतो.

अनेकदा तो नुसतं पाणी लावून दाढी करतो. बाप आजारी पडला तरी पटकन दवाखान्यात जात नाही. तो आजाराला मुळीच घाबरत नाही. डॉक्टर एखादा महिना आराम करायला लावतील याची त्याला भीती वाटते. कारण पोरीनं लग्न, पोराचं शिक्षण बाकी असतं. घरात उत्पन्नाचं दुसरं साधन नसतं. ऐपत नसते तरीही मुलाला मेडिकलला, इंजिनिअरिंगला प्रवेश मिळवून दिला जातो. ओढाताण सहन करून त्या मुलाला दर महिन्याला पैसे पाठविले जातात. पण सर्वच नसली तरी काही मुलं अशीही असतात की जे तारखेला पैसे येताच मित्रांना परमिट रुममध्ये पार्ट्या देतात आणि ज्या बापांनी पैसे पाठविले त्याच बापाची टिंगल करतात. एकमेकांच्या बापाच्या नावाने एकमेकाला हाका मारतात.

'आई घराचं मांगल्या असेल, तर बाप घराचं अस्तित्व असतो.' ज्या घरात बाप आहे त्या घराकडे वाईट नजरेनं कोणीही बघू शकत नाही. कारण घरातला कर्ता जिवंत असतो. तो जरी काहीही करत नसला तरीही तो त्या पदावर असतो आणि घरच्याचं कर्म बघत असतो. सांभाळत असतो. कोणाचा मुलगा होणं टाळता येत नाही. पण बाप होणं टाळता येतं. पण बाप कधीही बाप होण्याचं टाळत नाही, आईच्या असण्याला अथवा आई होण्याला बापामुळे अर्थ असतो.

कोणत्याही परीक्षेचा निकाल लागल्यावर आई जवळची वाटते कारण ती जवळ घेते, कवटाळते, कौतुक करते. पण गुपचूप जाऊन पेढ्यांचा पुडा आणणारा बाप कोणाच्याही लक्षात येत नाही. पहिलटकरणीचं खूप कौतुक होतं पण हॉस्पिटलच्या आवारात अस्वस्थपणे वावरणाऱ्या त्या बाळाच्या बापाची कोणीही दखल घेत नाही.

चटका बसला, ठेच लागली, फटका बसला 'आई गं!' हा शब्द बाहेर पडतात. पण हायवेला रस्ता क्रॉस करताना एखादा ट्रक जवळ येऊन ब्रेक अचानक लावतो तेव्हा 'बाप रे!' हाच शब्द बाहेर पडतो. कारण छोट्या संकटासाठी आई चालते, पण मोठमोठी वादळं पेलताना बापच आठवतो... काय पटतंय ना?

कोणत्याही मंगलप्रसंगी घरातील सर्व मंडळी जातात. पण मयताच्याप्रसंगी बापालाच जावं लागतं. कोणताही बाप श्रीमंत मुलीच्या घरी जास्त जात नसतो, पण गरीब लेकीच्या घरी उभ्या उभ्या का होईना पण चक्कर मारतो. तरुण मुलगा उशीरा घरी येतो त्याची आई नाहीतर बापच जागा असतो. मुलाच्या नोकरीसाठी साहेबांपुढे लाचार होणारा बाप, मुलीच्या स्थळासाठी उंबरठे झिजवणारा बाप, घरच्यांसाठी स्वत:च्या व्यथा दडवणारा बाप...खरंच किती ग्रेट असतो ना?

वडिलांच महत्त्व कोणाला कळतं?... लहानपणीच वडील गेल्यावर अनेक जबाबदाऱ्या खूप लवकर पेलाव्या लागतात. त्यांना एकेक वस्तूंसाठी झगडावं लागतं. वडिलांना खऱ्या अर्थाने समजून घेते ती म्हणजे त्या घरातील मुलगी. सासरी गेलेल्या अथवा घरापासून दूर असलेल्या मुलीला बापाशी फोनवर बोलताना बापाचा बदलेला आवाज एका क्षणात कळतो, मग ती अनेक प्रश्न विचारते. कोणतीही मुलगी स्वत:च्या इच्छा बाजूला ठेवून बाप म्हणेल तेव्हा विवाहाच्या बोहल्यावर चढते. मुलगी बापाला जाणते, जपते. इतरांनीसुद्धा असंच आपल्याला जाणावं हीच बापाची किमान अपेक्षा असते.

**- प्रेषक : मधुरा मराठे (पृ.१२०)**

वडाळा

(श्री. विलास भाऊसाहेब पाटणकर ह्यांनी वाचकचळवळीसाठी हा लेख संकलित केला होता.) साभार

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

शुक्रवार दिनांक २३ नोव्हेंबर २०१२ मराठे प्रतिष्ठानची बैठक विश्वस्त श्रीमती सुलभाताई मराठे यांच्या निवासस्थानी, दादर येथे झाली. बैठकीला अध्यक्ष, श्री. आनंदराव मराठे, उपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस, कार्यवाह श्री. मोहन मराठे, श्री. हेमंत मराठे, वा. ग. मराठे, श्री. प्रभाकर मराठे, श्रीनिवास मराठे, सी. गो. खांबेटे, भाऊ मराठे इ. तसेच सौ. वृषाली मराठे, सौ. शुभा विद्वांस, सौ. नंदिनी मराठे, डॉ. सौ. सुमेधा मराठे इत्यादी उपस्थित होते.

कार्यवाहांनी अहवाल वाचन केले. प्रतिवृत्त सादर केले. दिनांक २५डिसेंबरला पुणे येथे कुलसंमेलन व वर्धापन दिन साजरा होणार आहे. त्यासाठी सर्वांनी अगत्याने उपस्थित राहावे असे अध्यक्षांनी सांगितले. सुलभाताईंचा त्यादिवशी वाढदिवस होता म्हणून सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आणि त्यांचे अभिष्टचिंतन केले. अध्यक्षांनी खास केक वाढदिवसाप्रीत्यर्थ आणला होता.

श्री. भाऊ मराठे यांनी त्यांच्यावर कवी यशवंत देव यांनी केलेली कविता सुलभाताईंच्या आग्रहाखातर वाचून दाखविली (नाही कसला ताठा यांचे नाव जरी मराठे - डिसेंबर हितगुजमध्ये ती प्रकशित केली आहे.)

स्वादिष्ट अल्पोपहाराने सभा संपली.

---

रविवार दिनांक २५ डिसेंबर २०१२ ला पुणे येथे महालक्ष्मी सभागृहातील आदित्य हॉल, पर्वती येथे (सकाळी ९ ते सायंकाळी ५वाजता) मराठे कुलसंमेलन आणि पुणे शाखेचा वर्धापनदिन साजरा झाला. त्याचे सविस्तर वृत्त याच अंकात आले आहे.

---

रविवार दिनांक १९ फेब्रुवारी २०१२ला पुणे येथे वेदशास्त्रोत्तेजक सभा, येथे दुपारी ४ ते ६ या वेळेत खास वास्तुप्रकल्पासंबंधी सभा घेण्यात आली. मोठ्या संख्येने कुलबांधव उपस्थित होते. तळेगाव येथील जागा श्रीमती लीलाताई मराठे यांनी देणगी म्हणून दिली आहे. तळेगाव महानगरपालिकेत जाऊन काय काय प्राथमिक गोष्टी कराव्या लागतील हे ठरले.

---


**मराठे प्रतिष्ठानच्या मराठे परिवाराला सर्व सभासदांना नव्या वर्षांच्या शुभेच्छा!**

*

**चि. शार्दूल बाळकृष्ण मराठे (पृ.५४१)**

श्री २१०, ढवळी, फोंडा
गोवा - ४०३४०१
दूरभाष : ०८३२-२३१३२०५

*


धन्यवाद,

श्री. मंदार मराठे यांस,

नमस्कार, मी विजय मराठे, पुणे दिनांक १२-०२-२०१२च्या महाराष्ट्र टाईम्समध्ये आपल्या कामाची माहिती वाचून आनंद झाला. आपण ऑस्ट्रेलिया येथे मराठी शाळा २००७ पासून दर रविवारी घेत आहात. आज महाराष्ट्रात मराठी शाळेत मुलांची कमतरता आहे. ते आपण परदेशात मराठी बांधवांना उपलब्ध करून देत आहात. बरेच लांबून पालक मुलांना घेऊन येतात हे खरेच कौतुकास्पद आहे. आम्हाला आपल्या या कामाचे कौतुकच नाहीतर अभिमान आहे.मी आपले मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन करत आहे. आपल्या कार्यात उत्तरोत्तर प्रगती होत राहो असा आम्ही मराठे परिवारातर्फे आशीर्वाद देतो.

- विजय मराठे, पुणे
फोन नं. : ९४२३०११९४९

Marathe Pratishthan

# “शरण, शरण हनुमंता...”

**डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे**

*हनुमान जयंती ठिकठिकाणी साजरी केली जाते. हनुमान ही शक्तीची व शौर्याची आणि बुद्धीची देवता. हनुमंताचे भक्त सर्वत्र आहेत. हनुमंताच्या जीवितकार्याची उद्‌बोधक माहिती देणारा पुढील लेख ‘हितगुज’च्या वाचकांसाठी देत आहोत.*

\- संपादिका

हनुमान - एक देव, रामायणातील एक प्रमुख रामभक्त वानर. हनुमान म्हणजे सर्व मानवी गुणांचा अत्युच्च आदर्श आहे. पराक्रम आणि शौर्य हा हनुमंताचा स्थायीभाव आहे. रामायणात, राम म्हणतो -

*“शौर्य दास्यं. बलं धैर्य प्राज्ञता नयसाधंनम्।*
*विक्रमश्च प्रभावश्च हनूमतिः कृतःनयाः।।*

याचा अर्थ, शौर्य, दक्षता म्हणजे सतर्कता, सावधपणा, बल, धैर्य, बुद्धिमत्ता, राजनीती, राजकीय कृत्य शेवटाला नेण्याची हातोटी, पराक्रम आणि प्रभाव या सर्व गुणांनी हनुमानाचा आश्रय केलेला आहे. हे सर्व गुण हनुमानाच्या ठिकाणी एकवटलेले आहेत. म्हणजे या सर्व गुणांचा समुच्चय हनुमानामध्ये आहे. रामायणात त्याच्या या गुणांचे दर्शन होते.

वाल्मिकी म्हणतात, शास्त्र व वेदार्थ निर्णय यात हा प्रवीण आहे. याची बरोबरी करणारा जगात कोणी नाही. स्वत:च्या इच्छेप्रमाणे सूक्ष्म किंवा विक्राळ रूप धारण करण्याची विद्याही हनुमानाला अवगत आहे.

## राजनीतिज्ञ हनुमान

हनुमान राजनीतीचे सर्व बारकावे जाणणारा होता. सुग्रीवास तो सांगतो -

*‘यो हि मित्रेषु कालज्ञः सततं साधु वर्तते।*
*तस्य राज्यंच कीर्तिश्च प्रतापश्चापि वर्धते।।*

जो प्रसंग जाणणारा पुरुष म्हणजे तारतम्य आणि सारासार विवेक धोरणाने वागणारा धोरणी पुरुष मित्राशी नेहमी चांगल्या रीतीने वागतो, त्याच्या राज्यात कीर्ती व प्रताप यांची वृद्धी होत असते. ते राज्य सतत विजयी होत असते. राज्याच्या कल्याणासाठी नेमलेल्या मंत्र्यांनी राज्याच्या हिताच्या, कल्याणाच्या गोष्टी अवश्य केल्या पाहिजेत असे हनुमानाचे तत्त्व होते. हनुमानासारख्या उत्तम कार्यसाधक व तत्पर दूत ज्या राजाजवळ आहे त्याचे सर्व मनोरथ साध्य



होतील, असा प्रभुरामच्रंदानी निर्वाळा दिला आहे. प्रभुरामचंद्रांचा हनुमानावर अपार विश्वास होता. अत्यंत कसोटीची कामे त्यांनी हनुमानावर सोपविली होती. रावणवधानंतर सीतेला निरोप द्यावयास त्यांनी हनुमानाला पाठविले. आपण अयोध्येत येत आहोत हे भरताला सांगण्यासाठी प्रभु रामचंद्रांनी हनुमानाचीच निवड केली होती हे काम सांगताना रामचंद्र म्हणाले की, “मी येत असल्याचे वर्तमान ऐकल्यावर भरताच्या चेहऱ्यावरचे भाव कसे दिसतात, ते तू बारकाईने पाहा. भरताच्या मुखावरील भाव, त्याची दृष्टी आणि त्याचा बोलण्याचा अर्थ समजून घे.”

रामाज्ञेनुसार रामाच्या पुनरागमनाचा शुभ समाचार भरताला सांगण्यासाठी हनुमान नंदीग्रामी गेला. त्यावेळी भरत अतिशय भारावला आणि आनंदातिशयाने हनुमानाला त्याने ही भावविलक्षण, आनंद गोडवार्ता सांगितल्याबद्दल, एकलक्ष गाई, शंभर गावे आणि कुंडले घातलेल्या शुभाचारी सोळा कन्या भार्या म्हणून अपर्ण केल्या असे रामायणात वर्णन आले आहेत.

हनुमानाची आई अंजनी हिने अपत्यप्राप्ती व्हावी यासाठी मरुताची म्हणजे वायुदेवाची आराधना केली. मरुत प्रसन्न झाले आणि त्यांच्या कृपेने हा मुलगा झाला म्हणून त्याचे नाव ‘मारूति’. चैत्र शुद्ध एकादशीला, मघा नक्षत्रावर अरुणोदय समयी जन्म झाला म्हणून या दिवशी ‘हनुमान जयंती’ उत्सव ठिकठिकाणी मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. बलसंपन्न व पराक्रमी हनुमानाची उपासन मनोरथ पूर्ण करणारी, संकल्प सिद्धीला नेणारी अशी शक्ती असल्यामुळे हनुमानाचे भक्त केवळ व्यायाममंदिरातच दिसत नाहीत तर घराघरात आपल्याला पाहायला मिळतात. नवसाला पावणारा देव अशीही मारूतीविषयी श्रद्धा आहे. मारुतीचे मंदिर नाही असे खेडेगावर शोधूनही सापडणांर नाही. वीरमारुतीची मंदिरे स्वतंत्र असतात. तर दास मारुती राममंदिरात रामापुढे विनम्रतेने हात जोडून उभा असतो. वीर मारुती गदाधारी, युद्धाच्या पावित्र्यात असतो. हनुमानाच्या मंदिरात नेले असता भूतबाधेने पछाडलेल्या लोकांची भूतबाधा तात्काळ दूर होते. संत तुलसीदास ही म्हणतात, *“भूत, पिशाच्च निकट नही आवै। महावीर जब नाम सुनावै। नाशै रोग हरे सब पीरा। जपत निरन्तर हनुमत वीरा।।”*

हनुमान हे रामदासांचे मुख्य दैवत आहे. समर्थ रामदास आपल्या अभंगात म्हणतात-

*नाव मारुतीचे घ्यावे। पुढे पाऊल टाकावे।*
*अवघा मुहूर्त शकुन। हृदयी मारुतीचे ध्यान।।*
*जिकडे तिकडे जाती भक्त। पाठी जाय हनुमंत।*
*राम उपासना करी। सदा मारुती हृदयी धरी।।*

हनुमानाला रामदासांनी, ‘संगीतज्ञानमहंत’ म्हणून गौरविले आहे. रामराज्याचा एक महान आदर्श मारुतीच्या रुपात आहे म्हणून त्यांनी त्याची उपासना समाजात सुरू केली. समाज कृतीशील, कार्यप्रवण व्हावा या हेतूने समर्थांनी हनुमान उपासनेच्या प्रसाराचे कार्य केले. शहापूर, मसूर, अंबुज, शिराळे, मनपाडळे, पारगाव, माजगाव, बहेगाव, शिंगणावाडी, व चाफळ



Marathe Pratishthan

(येथील दोन मारुती) हे अकरा मारूती समर्थ स्थापित आहेत.

छत्रपती शिवाजीमहाराजांनी आपल्या राज्याच्या संरक्षणासाठी जे जे कोट, दुर्ग, गड बांधले त्या त्या ठिकाणी महाद्वारापाशी महाबली मारुती हातात गदा घेऊन उभा असलेला दिसतो. कर्तव्यपरायण, राजनिष्ठ, स्वामीसेवा तत्पर, यशस्वी असा रामदूत युद्धप्रिय, लष्करी बाण्याच्या वीर मराठ्यांना वंदनीय व प्रिय वाटतो. स्वामी विवेकानंदही आपल्या शिष्यपरिवाराला, हनुमानाची जीवनगाथा कथन करून शिष्यांची मने प्रभावित करीत असत.

### 'रामरक्षेत' मारुती

श्रीबुधकौशिक ऋषींनी रचलेले 'रामरक्षा स्तोत्र' म्हणजे एक दिव्य ग्रंथ आहे. श्रीसीतेसहित रामचंद्र या स्तोत्राची देवता आहे. सीता ही या मंत्राची शक्ती आहे, तर श्रीहनुमान या मंत्राचा संरक्षक आहे म्हणून 'श्रीमद्धहनुमना कीलकम' असे म्हटले आहे. याच स्तोत्रात ३३व्या ओवीत, मारूतीला वंदन करतान, बुधकौशिक ऋषी म्हणतात, *'मनोजवं मारुततुल्यवेगं। जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्। वातात्मजं वानरयूथमुख्यं। श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।'* - 'मनाच्या वेगाने, मनाच्या इच्छेप्रमाणे गमन करणारा, वाऱ्यासारखा वेग असलेला, इंद्रिये जिंकून ताब्यात ठेवणारा, बुद्धिमान, लोकांमध्ये श्रेष्ठ आणि वानरांच्या समुदायाचा प्रमुख असा जो श्रीरामदूत हनुमान त्याला मी शरण आलो आहे.''

रामावतारात प्रभुरामचंद्र हनुमाजींच्या ऋणात राहिले. अत्यंत निष्ठेने, कर्तव्यभावनेने, कर्तबगारीने केलेल्या हनुमंताच्या कामगिरीवर प्रभुरामचंद्र प्रभावित होऊन म्हणाले की, तुझ्या प्रत्येक उपकाराच्या फेडीसाठी मी प्राणदान देण्यायोग्य आहे.

### हनुमंताचा भक्तिभाव

रामाविषयी हनुमंताची पराकोटीची भक्ती. हनुमान हा अनन्य भक्त होता. भक्तिभाव व्यक्त करताना हनुमान रामाला म्हणतो -

*स्नेहो मे परमो राजंस्त्वायि तिष्ठतु नित्यदा।*
*भक्तिश्च नियता वीर भावो नान्यत्र गच्छतु।।*

रामराजा, तुझ्यावर माझे नेहमी परकाष्ठेचे प्रेम असो, माझी भक्ती अचल राहो आणि माझ्या मनातला भाव तुझ्याशिवाय अन्यत्र कोठेही न जावो. जोपर्यंत भूतलावर रामकथा प्रचलित असेल तोपर्यंत माझे प्राण राहोत. (आणि म्हणूनच हनुमानाची सप्तचिरंजीवांत गणना केली जाते.) सनक, सनंदन, सनातन, सनत्कुमार, शांडिल्य, मुदगल इ. ऋषींनी हनुमंताकडून रामतत्त्वाचे, भक्तीचे ज्ञान प्राप्त केले.

आणि म्हणूनच संतश्रेष्ठ तुकाराम महाराजही एका अभंगात हनुमंताला विनवणी करून म्हणतात, ''शरण, शरण हनुमंता। काय भक्तीच्या त्या वाटा। मज दावाव्या सुभटा...।'' सुभटा म्हणजे चांगल्या योद्ध्या म्हणून सन्मानिले आहे.

आपण, कर्तव्यनिष्ठेचे नित्य पालन करणे, आपले जीवन थोर ध्येयासाठी वेचणे म्हणजेच हनुमानाची उपासना करणे आहे.

सूर्यावरही झेप घेणारा, सागरही उल्लंघून जाणारा महाप्रतापी अशा हनुमानाचे जीवन चरित्र म्हणूनच स्फूर्तीदायी, चैतन्यमय तसेच प्रेरणादायक आहे.

**- डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे**
**(पृ.१२०)**
संपादिका
८/१३, सहकारनगर, वडाळा, मुंबई
फोन नं. : ०२२-२४१५०८८९

## निवेदन

मराठे प्रतिष्ठानच्या पुणे शाखेच्या कार्यालयीन कामाकाजासाठी डॉ. चिंतामणी रामचंद्र मराठे यांनी त्यांची स्वत:ची राहती जागा सौजन्यपूर्वक उपलब्ध करून दिली आहे. या जागेतील मराठे प्रतिष्ठानचे कार्यालयीन कामकाज पहिल्या व तिसऱ्या रविवारी सकाळी १० ते १२ या वेळेत चालू राहील. या जागेतील कामाकाजाची जबाबदारी श्री. श्रीनिवास गोपाळ मराठे यांनी स्वीकारली आहे. त्यामुळे मराठे प्रतिष्ठानशीसंबंधित कोणतेही काम असल्यास वरील वेळेत रविवारी संपर्क साधावा.

कर्वेरोड व पौडरोडवरील ज्या कुलबांधवांना हितगुजचे अंक श्रीनिवास मराठे घरपोच आणून देतात त्यांनी कृपया खालील पत्त्यावरून घेऊन जावेत ही विनंती.

मराठे प्रतिष्ठान पुणे कार्यकारिणीची सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी सकाळी १० वाजता होईल. बैठकीमध्ये सहभागी होण्याची इच्छा असेल त्यांनी अवश्य यावे. आपले स्वागतच आहे. बैठक व संपर्कासाठी पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक :

**१. डॉ. चिंतामणी रामचंद्र मराठे :** अमोली अपार्टमेंट, घर क्रमांक १५, २रा मजला, संगमप्रेस रोड कोथरूड, पुणे- ४११०३८

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५४४९२८७ भ्रमणध्वनी क्रमांक : ९८५०४९३३८८

**२. श्री. श्रीनिवास गोपाळ मराठे :** दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५४६४७०६ भ्रमणध्वनी क्रमांक : ८२७५५७३०९२

## अभिनंदन

गीताधर्म मंडळ पुणे ह्यांचे तर्फे अभिनव निबंध स्पर्धा२०११ अंतर्गत 'लोकमान्य टिळक ह्यांच्या गीतारहस्याचा संदेश' ह्या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित केली होती. त्या स्पर्धेत डॉ. चिंतामणी रामचंद्र मराठे (पृ.४१ घराणे दुसरे) यांना पारितोषिक मिळाले.

मराठे प्रतिष्ठानतर्फे डॉ. चिंतामणी रामचंद्र मराठे यांचे हार्दिक अभिनंदन!

## नांदा सौख्यभरे

सौ. सुवर्णा व श्रीकृष्ण सी. मराठे, पुणे यांची सुकन्या सौ. कां. प्राजक्ता हिचा शुभविवाह चि. सिद्धेश रमेश आठवले यांच्याबरोबर दिनांक १८-१२-२०१२ला सकाळी ११ वाजून ३१ मिनिटांनी मनोहर मंगल कार्यालय, पुणे येथे थाटामाटात संपन्न झाला.

मराठे प्रतिष्ठानद्वारा वधूवरांना शुभाशीर्वाद व शुभेच्छा!



Marathe Pratishthan

# गायत्री मंत्र व्याख्या आणि व्याप्ती

**प्रा. विश्वास चक्रदेव, मुंबई**

गायत्रीपासून ज्या अनेक गोष्टी निर्माण झाल्या, त्यामध्ये महान तेज निर्माण झाले. ब्रह्मदेवाने या प्रचंड तेजाची साठवण केवळ अंगुष्ठमात्र जागेत करून तो तेजकुंभ फक्त मानवाच्या स्वाधीन केला. हा कुंभ मानवाच्या शरीराच्या मध्यामध्ये नाभीजवळ ठेवण्यात आला आहे.

या कुंभाभोवती वायू आणि नाद यांचे साम्राज्य आहे. यालाच योग क्रियेमध्ये कुंडलिनी म्हणतात. या शक्तीला साडेतील वलये असून ती शक्ती अत्यंत सुप्त अवस्थेत राहते. गायत्रीचा तेजकुंभ नाभीजवळ आहे. त्याच ठिकाणी वायूतून प्रादुर्भूत होणारी कुंडलिनी नावाची शक्ती आहे. मणिपूर नावाचे चक्र त्याच ठिकाणी आहे.

### गायत्री मंत्राबद्दल व त्याची उत्पत्ती याबद्दल थोडेसे :

भारतीयांचे प्राचीनतम बरेचसे वाङ्मय मंत्रमय आहे. चार वेद, उपनिषदे आणि भगवद्गीता ही अध्यात्म शास्त्रातील प्रस्थानत्रयी आहे. हे सर्व ग्रंथ ज्याप्रमाणे विविध माहिती देतात, त्याप्रमाणे त्यांच्या शब्दात अबाधित मंत्रमयता आहे. सप्तशती, ज्ञानेश्वरी, श्रीमत् आद्य शंकराचार्यांची काही स्तोत्रे ही मंत्रमय आहेत. आज कित्येक वर्षे या मंत्राचा प्रत्यय लोकांना येत आहे.

या मंत्राच्या उपासनेने मानवी जीवन समृद्ध होते. मंत्राच्या साह्याने सामान्य माणसालासुद्धा ऐहिक आणि पारलौकिक प्रतिष्ठा प्राप्त होते. त्या ठिकाणचे सुखोपभोग त्याला प्राप्त होतात आणि खऱ्या अर्थाने मानव सुखी होतो. ऐहिक सुख अत्यंत संकुचित आहे तर पारमार्थिक सुख विशाल आहे. ऐहिक सुख अशाश्वत आहे तर पारमार्थिक सुख शाश्वत आहे. अर्थात अशाश्वत सुखातूनच शाश्वत सुखाकडे जाण्याचा मार्ग आहे. हा मार्ग चालण्यासाठी सर्वांत चांगली साथ मंत्राची आणि मंत्रामुळे मिळते. परंतु अलीकडे मंत्र म्हणजे काही भीतिप्रद क्रिया आहे, त्याच्या वाटेस सामान्य जाऊ नये, विज्ञान इतके प्रगत असताना आणि त्यातून मिळणारे सुख त्वरेने मिळत असता या मंत्राचा उपयोग करुन सुखाच्या मागे लागणे म्हणजे शुद्ध वेडेपणा आहे, असा समज तथाकथित बुद्धिमान आणि सुशिक्षित लोकांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर आहे. हे लोक या मंत्रशास्त्राच्या मुळाशी काय आहे हे पाहण्याचा प्रयत्नच करीत नाहीत. त्यामुळे हे प्राचीनज्ञान आणि वैभव त्यांच्या वाट्याला येत नाही. मंत्रशास्त्राची ओळख करून घेणे प्रस्तुतच्या काळात सुद्धा उचित आहे. अर्थात सर्वच मंत्राचा आढावा या ठिकाणी घेता येणार नाही, पण त्यातल्या अत्यंत प्रभावी मानल्या गेलेल्या पवित्र गायत्री मंत्राबद्दल अधिक चर्चा करण्याचा प्रयत्न आहे.

### मंत्र म्हणजे काय?

*मननात् गायते इति मंत्रः।*

ही मंत्राची व्याख्या आहे किंवा मंत्र शब्दाची व्युत्पत्ती आहे. या व्याख्येमध्ये फार मोठा अर्थ भरलेला आहे. सामान्य माणसाची अशी कल्पना असते की काही शब्दाचा किंवा अक्षरांचा समुदाय म्हणजे मंत्र, पण मंत्राची ही व्याख्या मुळीच बरोबर नाही. अन्यथा 'अ' पासून ज्ञ पर्यंत सर्व अक्षरे एकत्र केली की मंत्र झाला असता.

*अगा बावन्ना वर्णापरता।*
*कोण मंत्रु आहे पंडुसुता ॥*
*का बावन्नही नुच्चारिता। जीवु आथी ॥*

१८-३६३ ज्ञानेश्वरी

एखादे अक्षरसुद्धा त्याला प्राप्त झालेल्या अर्थामुळे शब्द बनते. न म्हणजे नाही किंवा हो - होय या एका अक्षरातूनसुद्धा अर्थ निर्माण होतो. अशाच अर्थपूर्ण शब्दाचा मंत्र होतो.

मंत्राच्या मागे अर्थाची जी प्रभावळ आहे ती तो मंत्र उच्चारणारा आणि ऐकणारा यांच्या मनावर काही ठसा निर्माण करते. मनावर पुन्हा पुन्हा आघात होणे आणि त्या आघाताची मनाने सतत नोंद घेणे म्हणजे मनन होय. या मननाने त्या शब्दाच्या अर्थातून निर्माण होणाऱ्या अपेक्षित कृतीखेरीज अन्य कृतीपासून मनुष्याला परावृत्त करणे म्हणजेच 'मननात् गायते।' ''मननात् गायते' या उक्तीची ही स्थूल चर्चा आहे. मनन त्या क्रियेचा 'मन न' हा अंतिम परिणाम आहे. मन नाहीसे करणे म्हणजे मनाच्या स्थिरतेत मनाच्या क्रिया जिरविणे होय. मन आहे तोपर्यंत मनुष्य व्यवहारमय असतो. मंत्र या संस्कृती धातूचा अर्थ बोलणे, चर्चा करणे असा आहे. प्रत्यक्ष देवाजवळ बोलणेही सर्वश्रेष्ठ चर्चा होय. म्हणजेच ज्यायोगे माणसाला देवत्वाचे सान्निध्य लाभते या शब्दात अगर अक्षरांना मंत्र म्हणता येईल.

कोणत्याही मंत्राचा विचार करण्यापूर्वी मंत्राच्या इतर अंगाचा बारकाईने विचार करावा लागतो. स्वरांचे उच्चार महत्त्वाचे आहेत. प्रत्येक स्वर स्थूलमानाने तीन प्रकारे उच्चारता येतो. त्यांना ऱ्हस्व, दीर्घ व लुप्त अशी संज्ञा आहे. ह्यातील ऱ्हस्व आणि दीर्घ या उच्चारांची माहिती सामान्य माणसास आहे, परंतु लुप्त उच्चाराचा तितकासा परिचय नाही. शास्त्रीय भाषेत ऱ्हस्व म्हणजे एक मात्रा, दीर्घ म्हणजे दोन मात्रा व लुप्त म्हणजे तीन मात्राचा उच्चार होय. ऱ्हस्व, दीर्घ हे उच्चार अक्षरांच्या लिखाणावरून सामान्यपणे लक्षात येतात. परंतु लुप्त, उदात, अनुदात स्वरित हे सर्व दर्शविण्यासाठी स्वतंत्र रीत वापरलेली असते. एखाद्या अक्षराच्यावर तीनचा आकडा लिहून लुप्त स्वर दर्शविण्याची पद्धत आहे तर अक्षराच्या खाली आडवी रेघ लिहून उदात, अक्षरावर उभी रेघ देऊन अनुदात व काहीही खुण न करता स्वरीत उच्चार दर्शविण्याची पद्धत आहे. गायत्री मंत्रात ह्या अक्षरांचा बोध होईल.

*ॐ भूः भुवः सुवः तत्सं वितुर्वरैण्यं*
*भर्गो देवस्यं धीमहि।*
*धियो योन नेः प्रचोदयात्॥*

सर्व वर्णांच्या उच्चाराचा परिणा मानवी देहावर सदैव घडत असतो. प्रत्येक मंत्राला देवता असते. याचा अर्थ असा की कोणता मंत्र कोणत्या देवतेचे वैभव मानवाला प्रदान करतो. ती त्या मंत्राची देवता असते. वेदामध्ये निरनिराळे



Marathe Pratishthan

मंत्र निरनिराळ्या देवतासाठी आहेत.

## गायत्री मंत्र वैभव

गायत्री मंत्राच्या प्रारंभी असलेला प्रणव आणि तीन व्याहती सोडून शिल्लक राहिलेला मूळ गायत्री मंत्र होय. या मंत्रात ध्वनीप्रमाणे चोवीस अक्षरांचा किंवा दहा शब्दांचा समावेश आहे. गायत्री मंत्रात अगाध सामर्थ्य आहे. त्याप्रमाणे मंत्रामध्ये असलेल्या शब्दात आणि अक्षरातदेखील आहे. या अक्षरांमध्ये काय सामावले आहे ते पाहण्याची आवश्यकता आहे. गायत्री मंत्रामध्ये जो प्रभाव आहे तो चोवीस अक्षरांचा एकत्रित प्रभाव आहे. हा प्रभाव किती तीव्र व सूक्ष्म आहे याची माहिती होण्यासाठी प्रत्येक अक्षरांचा अभ्यास करणे जरूर आहे.

**१. 'तत्' :** हे मंत्रातील पहिले अक्षर आहे. तत् ध्वनी म्हणून एकच अक्षर मानण्यात येते. या अक्षराचे ऋषी वशिष्ठ असून अग्नी ही देवता आहे. या अक्षराचे उच्चार स्थान दन्त असले तरी प्राकृतिक परिणाम मेंदू किंवा मस्तकावर घडत असतो. अग्नी ती ऋग्वेदाची पहिली देवता आहे. त्यामुळे गायत्री मंत्रातसुद्धा अग्निरूप असलेल्या अग्नीची योजना आरंभी करण्यात आली आहे. अग्नी देवतांचे मुख आहे.

*ॐ हिरण्यवर्णां हरिणीं सुवर्णरजतस्त्रजाम।*
*चंद्रा हिरण्यमयी लक्ष्मी जात वेदो म आवह।।*

ही श्रीसुक्ताची पहिली ऋचा असून तीत जातवेद म्हणजे अग्नीलाच विनंती करण्यात आली आहे. अग्नीचे महत्त्व अध्यात्मशास्त्रात किंवा उपासनेत किती मोठे आहे हे लक्षात येईल.

**२. 'स.' :** मंत्रातील हे दुसरे अक्षर आहे. या अक्षराचे ऋषी भारद्वाज असून देवता वायू आहे. मंत्रातील या अक्षरावर जोर देऊन म्हणताना कपाळाच्या मध्यभागी लक्ष ठेवावे. या अक्षराच्या ध्वनीचा परिणाम मनुष्याच्या भालप्रदेशी होतो. मस्तक तेजोवान बनते.

विज्ञानशास्त्रात विजेच्या गतीचे प्रतिनिधीत्व करणारे हे अक्षर आहे. या अक्षराच्या उपासनेने गतीवर चांगले नियंत्रण मिळवता येते.

**३. 'वि' :** या अक्षरात 'व्' आणि 'इ' या दोन वर्णांचा समावेश आहे. त्यामुळे याचा उच्चार ओठ आणि टाळू यांच्या साह्याने होतो. या अक्षराची देवता सूर्य असून ऋषी गौतम आहेत. या अक्षराचा परिणाम डोळ्यावर होतो. सूर्य य देवतेची उत्पत्ती विराट पुरुषाच्या नेत्रांपासून झाली असल्याबद्दल माहिती आहे. या अक्षराच्या उपासनेने साधनांचे अंत:चक्षू उन्मलित होतात. आणि विज्ञानात हे अक्षर विजेच्या तेजाचे प्रतिनिधित्व करते.

४. 'तु:' : या मध्ये 'त्', 'उ' आणि विसर्ग याचा समावेश आहे. त् चा उच्चार दात, ओठ आणि विसर्ग कंठातून म्हटला जातो. या विसर्गाच्या पुढे व हे अक्षर आहे म्हणून विसर्गाचा र् होऊन त्याचा संबंध मुर्धा या स्थानाशी होतो. या अक्षराची देवता विष्णू असून ऋषी भृगू आहेत. या अक्षराच्या ध्वनीचा उपयोग गालावर होतो. उदात्त ह्या स्वरामुळे गालाच्या आतल्या भागाला सूक्ष्म परिणाम होऊन वाचेला शुद्धता प्राप्त होण्यास मदत होते. या अक्षराच्या उपासनेमुळे पांढऱ्या पदार्थाबद्दल प्रीती निर्माण होते. विज्ञानात विजेच्या प्रवाहाचे प्रतिनिधित्व ह्या अक्षराने केले जाते.

५. 'व' : हे अक्षर उच्चारताना ओठांचा उपयोग करावा. याचा उच्चार कोमल असून उदात्त स्वरामुळे तो अधिक कोमल होतो. या अक्षराची देवता आर्यमा असून ऋषी शांडिल्य आहेत. ही देवता पितृ लोकांचे अधिपत्य करते. ही संसारी उणीव भरून काढणारी देवता आहे. सूक्ष्म आणि अधिक अंतरावर असणारे गंध या अक्षराच्या उपासनेने चांगले जाणवतात. असे गंध जाणवणे ही सिद्धी नसून शरीर सुचितेची अवस्था आहे. ती एकदा प्राप्त झाल्यावर नाहीशी होत नाही.

*क्रमश:*

**- प्रा. विश्वास चक्रदेव**
ए ६/६, ब्लॉक २६, जीवनशांती सागर
सोसायटी, जीवनबिमा नगर, बोरिवली (प.)
मुंबई- ४००१०३ फोन नं. : ९९६९१४४०९७

## Smile Please

A smile costs nothing, but gives much
It enriches those who receive, without
making poore those who give
It takes but a moment, but the memory of it
Sometimes lasts forever

A smile creates happiness in the home
fosters good will in business and is the
countersign of friendship
It brings rest to the weary, cheer to the
discouraged, sunshine to the sad, and it is
nature's best antidote for trouble

It is no value to anyone until it is given away
Some people are too tired to give you a smile
Give them one of yours
as none needs a smile so much
As he who has no more to give

**- प्रेषक : चित्रकार राजा मराठे**
१४, उद्यम, उद्यमकुंज सोसायटी,
राणी सती मार्ग, मालाड (पू), मुंबई ४०००९७
फोन नं. : ०२२-२८७७८६३९

Marathe Pratishthan

# गुणगौरव

*माझी मुलगी सौ. नीता सोमठाणकर, बदलापूर येथे राहते. तिला झी मराठीतर्फे ''होम मिनिस्टर'' या खेळात भाग घेण्याची संधी मिळाली होती आणि तिने सर्व बक्षिसे व पैठणीही जिंकली. आपले आईवडील यावेळी आपल्यासोबत असावेत अशी तिची फार इच्छा होती. व आमचीही होती. परंतु काही अपरिहार्य कारणामुळे आम्ही त्यावेळी हजर राहू शकलो नाही. त्याची आम्हाला असणारी टोचणी व खंत आणि मुलीचे कौतुक हे काव्यरूपाने करण्याचा हा आमचा प्रयत्न.*

*होम मिनिस्टरचा खेळ खेळली अंगणात*
*जिंकुनी पैठणी आणली घरात*
*मूर्ती तिची दिसते लहान*
*बुद्धी आहे परि महान*
*विपुल नाहीत सोन्याचे साज*
*नाही चंदनाची चोळी, तरीही विलसते*
*समाधानाचे तेज सदा तिच्या भाळी*
*रूपाने आहे साजिरी गोजिरी*
*कृपा आहे सरस्वतीची तिजवरी*
*पैठणीचा खेळ बघण्यावेळी*
*मातापिता नव्हते जवळी*
*अभिमान होता त्यांच्या मनात*
*प्रार्थनाही चालू होती देवघरात*
*मातेच्या फेऱ्या होत्या परसात*
*करीत होती आशीर्वादाची बरसात*
*मातापित्याच्या जीवनातून*
*गेला आहे तो क्षण निसटून*
*हजर असणे हा तर आनंदाचा ठेवा*
*तरी दुरूनच देत होता शुभेच्छांचा मेवा*
*मातेच्या मनी होती हुरहुर*
*नयनात होता अश्रूंचा पूर*
*खंत होती हजर नसण्याची*
*खात्री होती तिच्याच जिंकण्याची*

**- सौ. नीलिमा विद्वांस**



Marathe Pratishthan

## प्रत्येकाचं स्वप्न, प्रत्येकाचं घर



घरातल्या प्रत्येकाच्या स्वप्नांचा आम्ही विचार करतो.
म्हणूनच आम्ही प्रत्येक गृहरचनेत मोकळेपणा, उत्कृष्ट जीवनशैली आणि आधुनिक सुखसुविधांचा समावेश करतो. हे घर तुम्हांला सहजतेने घेता यावं यासाठी वाजवी दरही देतो.
हेच तर आहे निर्माण. तुमच्या स्वप्नांचे आणि सुंदर गृहरचनांचे !

विश्वसनीय परंपरा आणि पारदर्शक व्यवहार

निर्माण ग्रुप ऑफ कंपनीज्
बिल्डर अँड डेव्हलपर्स

आमचे आधुनिक जीवनशैलीचे प्रकल्प

मुंबईतील प्रकल्प स्थाने : महालक्ष्मी | जोगेश्वरी | मालाड (आझाद) | कांदिवली (पूर्व) आणि (पश्चिम) | गोवंडी | जोगेश्वरी

मुंबई बाहेरील प्रकल्प स्थाने : नेरळ | गोरेगाव आणि माणगाव | गणपतीपुळे

Project marketed by DREAMZ (A NIRMAN Group Enterprise)

हेड ऑफिस : 14, न्यायसागर, चिनॉय कॉलेज जवळ, जुना नागरदास रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - 400069
फोन : 91 9987686847 / 48 / 49 | SMS <DREAMZ> 567678


BOOK POST

If undelivered,
please return to

**संपादिका : 'हितगुज'**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१

**मराठे परिवाराला नवीन वर्ष सुखसमृद्धीचे व समाधानाचे, उत्तम आरोग्याचे आणि भरभराटीचे जावो, ह्या शुभेच्छा!**


त्रैमासिक 'हितगुज' हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ई-मेल: prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल : (१) sitaram_khambete@yahoo.com (२) maratheparivar@yahoo.co.in ⦿ वेबसाईट : www.marathepratishthan.org


Marathe Pratishthan